RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

अमरावती

१५ रविवार फेब्रुवारी २०२६

✻ वर्ष ५ ✻ अंक २६१

✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

दैंनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.

घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:

9975532291/9096945629

## विद्यार्थ्यांना मिळणार मोफत दप्तर

### इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्णय

**▸विदर्भ केसरी। ठाणे -**



महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून शुक्रवारी हा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांचा शैक्षणिक खर्चाचा भार कमी करणे, शाळेत नियमित उपस्थिती वाढवणे, तसेच ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांना शिक्षणात टिकवून ठेवणे हा या योजनेमागील मुख्य हेतू असल्याचे या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. तर मुंबई सारख्या ज्या महापालिकेच्या शाळांमध्ये याआधीपासूनच मोफत दप्तराची सुविधा देण्यात येत आहे या शाळांना यातून वगळण्यात आले आहे.

सरकारी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढावी यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपायोजना राबविण्यात येतात. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन शासन विविध पूरक योजना आधीपासून राबवत आहे. विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, दोन गणवेश, मध्यान्ह भोजन योजना, शैक्षणिक साहित्य तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या सर्व योजनांना पूरक म्हणून आता मोफत दप्तर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य एकत्रित स्वरूपात मिळणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता १ ली ते ८ वीच्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून ज्या महानगरपालिका किंवा नगरपालिकांकडून आधीपासून मोफत दप्तर योजना राबविली जाते, त्या शाळांना या योजनेतून वगळण्यात येणार आहे. उर्वरित शाळांमधील विद्यार्थ्यांना शासनामार्फत दप्तर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने सुमारे १६५ कोटी इतक्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली असून हा निधी शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत वितरित केला जाणार आहे. दप्तर खरेदी प्रक्रिया शासनाच्या प्रचलित नियमांनुसार पारदर्शक पद्धतीने राबविली जाणार असून शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या स्तरावरून संपूर्ण अंमलबजावणी केली जाईल.

तर वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार निधी वितरण व खर्च नियंत्रणाच्या सर्व नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. वितरित निधीचा उपयोग निश्चित उद्देशासाठीच करण्यात यावा तसेच त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे बंधनकारक राहील.

#### लाखो विद्यार्थ्यांना होणार लाभ

- **या निर्णयामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार असून शिक्षणासाठी आवश्यक साधनसामग्री सहज उपलब्ध झाल्याने शाळेतील उपस्थितीत वाढ होण्यास मदत होईल, शैक्षणिक असमानता कमी होईल आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना मिळेल. विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत शिक्षणप्रणाली अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा असल्याची प्रतिक्रिया ठाणे जिल्हा शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.**

## पुण्यात भीषण अपघात; ३ ठार

**▸विदर्भ केसरी। पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील शिरूर तालुक्यातील नागरगावात मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात ३ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात वंदना काळे या गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांच्यासमोरच भाऊ, नवरा अन् मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला. मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात पवन राजहंस काळे (३४) व त्यांची चिमुकली मुलगी आराध्या काळे (९, दोघे रा. निमोणे), तसेच मेहुणे बाळासाहेब प्रकाश नागवडे (३८, रा. बाबुराव नगर, शिरूर; मूळ रा. गुनवडी, जि. अहिल्यानगर) यांचा मृत्यू झाला. वंदना पवन काळे (३०) या गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी पुणे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डोळ्यांसमोर नवरा, भाऊ अन् मुलीचा मृत्यू झाल्याने वंदना हादरून गेल्या आहेत. न्हावर-चौफुला राष्ट्रीय महामार्गावरील नागरगाव (ता. शिरूर) हद्दीतील नलगे वस्ती येथे मध्यरात्री भरधाव ट्रकने समोरून येणा-या कारला दिलेल्या भीषण धडकेत एकाच कुटुंबातील बाप, चिमुकली मुलगी आणि मेहुणा जागीच ठार झाले. तर पत्नी गंभीर जखमी अवस्थेत मृत्यूशी झुंज देत आहे. निमोणे गावावर शोककळा पसरविणारी ही घटना घडली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निमोणे येथील पवन काळे हे पत्नी, मुलगी व मेहुण्यासह कोल्हापूर येथे शिक्षणासाठी असलेल्या मुलाला भेटून परत येत होते. नागरगाव हद्दीतील नलगे वस्ती येथे रात्री सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास शिरूरकडून येणा-या ट्रक (एम.एच ०९ ई.एम २४६४) ने त्यांच्या मोटार (क्र. एम.एच १२ एस.क्यू ५४४१)ला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की कारच्या पुढील भागाचा चक्काचूर झाला. अपघातानंतर परिसरात एकच आक्रोश उसळला. डॉक्टरांनी तिघांना मृत घोषित करताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या प्रकरणी ट्रकचालक धनराज काशिनाथ भिसे (रा. भिसे वाघुली, जि. लातूर) याच्याविरुद्ध शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'टिपू सुलतान वीर योद्धा : हर्षवर्धन सपकाळ

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज शनिवारी, बुलढाण्यातील आपल्या निवासस्थानी शहरातील मोजक्या प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधी समवेत संवाद साधला. यावेळी विचारण्यात आलेल्या विविध विषयावरील प्रश्नांवर दिलखुलास उत्तर देताना त्यांनी विरोधकांवर जोरदार टीका केली. मात्र त्यांनी म्हैसूरचे राजे टिपू सुलतान यांच्यावर केलेले भाष्य वादग्रस्त ठरण्याची चिन्हे असून याचे पडसाद राज्यात उमटणार अशी चिन्हे आहे.

मालेगाव महापालिकेच्या उपमहापौरांनी आपल्या कार्यालयीन कक्षात लावलेल्या टिपू सुलतानच्या प्रतिमेबद्धल विचारणा केली असता छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्या विरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान एक शौर्य गाजवणारे योद्धे, भूमिपुत्र होऊन गेले असे सांगून त्यांनी विखारी विषारी विचारणा जवळ केली नाही. त्यामूळे शौर्याचे लक्षण म्हणून त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघायला पाहिजे, असे सपकाळ म्हणाले.

मुंबईतील काँग्रेसच्या बैठकीबद्धल ते म्हणाले, संघटना बांधणी आणि पुढील वर्षात वाटचाल, याविषयी चर्चा साठी काँग्रेसची १७ आणि १८ फेब्रुवारी ला बैठक आहे. ऑन राज्यातील जिल्हाध्यक्षसह पदाधिकारी बदलण्यावर ते म्हणाले, या संघटनात्मक बाबी आहेत त्याबद्दल पक्षाच्या बैठकीत चर्चा करू. ज्येष्ठ नेते शरद पवार राज्यसभा निवडणूक लढणार याविषयी सपकाळ म्हणाले, यासंदर्भात जेंव्हा बैठक होईल, तेंव्हा चर्चा होईल. मात्र यासंदर्भात महाविकास आघाडीमध्ये संवाद होण्याची गरज आहे. किंबहुना व्यापक चर्चा होणे गरजेचे असून त्यानंतर यावर बोलणे योग्य होईल.

भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या आव्हानावर ते म्हणाले, त्यांचा बंगला विकत घेण्याची माझी ऐपत नाही. मात्र 'रेडिरेकनर दरात' विकत असतील तर जरूर विचार करेन, अशी मिश्किल प्रतिक्रिया त्यांनी दिली.

अजित पवार यांचा अपघात संशय, टीकेचा विषय ठरला आहे. त्यात खासदार प्रफुल पटेल यांनी दादांना फोन केला तर माझा काय दोष? असा प्रश्न केला होता. त्यावर सपकाळ म्हणाले, पटेलांचा तो मी नव्हेच म्हणण्याचा जुना स्वभाव आहे, त्यात आश्चर्य ते काय? अजित पवार आणि शरद पवार भूमिपुत्र असताना आता पटेल आणि तटकरे पक्ष चालवणार का हा कळीचा मुद्दा आहे.

## 'डिजिटल अरेस्ट'ची धमकी देणाऱ्या उच्चशिक्षित चोराला नक्षलग्रस्त भागातून अटक

**▸विदर्भ केसरी। अहिल्यानगर :**

पोलीस अधिकारी असल्याचे भासवून नागरिकांना धमकावून खंडणी मागणाऱ्या व अटकेची भीती घालणाऱ्या (डिजिटल अरेस्ट) सराईत परंतु उच्चशिक्षित आरोपीला अहिल्यानगर सायबर पोलीस पथकाने गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षलग्रस्त भागातून पाठलाग करून बेड्या ठोकल्या. चंदन दिगूराम सांगळे (वय ३०, आष्टी, गडचिरोली) असे या आरोपीचे नाव आहे. त्याला न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. त्याच्याविरुद्ध राज्यात इतर ठिकाणीही गुन्हे दाखल आहेत.

चंदन सांगळे याने स्वतःची ओळख 'वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल पाटील' अशी अहिल्यानगरमधील तक्रारदाराला क रू न दिली. 'तुमच्याविरुद्ध तक्रार आ ली असून तुम्हाला व तुमच्या कुटुंबाला अटक करायची नसेल, तर ५ लाख रुपये द्या,' अशी धमकी देऊन त्याने खंडणीची मागणी केली. चंदन याने अत्यंत तांत्रिक पद्धतीने फिर्यादीला घाबरवून सोडत अटकेची भीती घातली होती . याप्रकरणी सायबर पोलीस ठा ण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करून चंदन सांगळे यांचा शोध घेऊन पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या नेतृत्वाखालील पथक गडचिरोलीला रवाना झाले. आष्टी (ता. चामोर्शी) परिसरात पोलीस पथकाला पाहताच आरोपी चंदन सांगळे याने आपल्या स्विफ्ट मोटारीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, नक्षलग्रस्त आणि दुर्गम भाग असूनही पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करून त्यास आष्टी पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेतले. अटक केलेला आरोपी चंदन सांगळे हा पदव्युत्तर अभियांत्रिकी शिक्षित असून, तो तांत्रिक ज्ञानाचा वापर करून इंटरनेटच्या माध्यमातून विविध होस्टेल चालक, लॉज मालक यांचे संपर्क क्रमांक व माहिती प्राप्त करून, त्यांना लक्ष्य करून फसवणूक करत असे. त्याच्यावर यापूर्वी रत्नागिरी, गोंदिया जिल्ह्यातही फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. चंदन सांगळे याने गुन्ह्यात वापरलेला मोबाईल पोलीसांनी जप्त केला. अहिल्यानगर न्यायालयाने त्यास ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

## पिस्टल विक्रीच्या प्रयत्नात पाच जणांना अटक

**▸विदर्भ केसरी। सातारा :**



स्थानिक गुन्हे शाखेने लोणंद (ता. खंडाळा) बसस्थानक परिसरात सापळा लावून अवैध पिस्टल विक्रीसाठी आलेल्या पाच जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून तीन देशी बनावटीची पिस्टल, पाच जिवंत काडतुसे, एक मोटार व सहा मोबाईल हॅन्डसेट असा एकूण १२ लाख ६७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक तुषार दोशी सातारा व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी जिल्ह्यात अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांच्या अधिपत्याखाली वाई येथील काहीजण मोटार (एम एच १२ एन इ ९२१०) मधून लोणंद बसस्थानक परिसरात देशी पिस्टल व काडतुसे विक्रीसाठी येणार असल्याच्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सापळा लावून संशयिताना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये निखील शिवाजी मोरे (गंगापुरी, वाई), आयुष चंद्रकांत अडसुळ (रविवार पेठ, वाई), यश बबन चव्हाण (बावधन, ता. वाई), नितीन दत्ता वाडकर (बावधन, ता. वाई) आणि सनी काशिनाथ भोसले (खानापूर, ता. वाई) यांचा समावेश आहे. त्यांच्या विरोधात लोणंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वजण अभिलेखावरील गुन्हेगार आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, परितोष दातीर तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. या यशस्वी कारवाईबद्दल पोलीस अधीक्षक तुषार दोशी व अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर यांनी संबंधित अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे

## स्लॅब कोसळल्याने एकाचा मृत्यू, 3 जखमी





**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

मुंबईतील मुलुंड येथे निर्माणाधीन मेट्रोचा स्लॅब कोसळल्याने एकाचा मृत्यू झाला. यात 3 जण जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यातील एकाची प्रकृती गंभीर आहे.

मुलुंडमधील लालबहादूर शास्त्री मार्गावर जॉन्सन अँड जॉन्सनसमोरील रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू आहे. शनिवारी दुपारी अडीचच्या सुमारास बांधकाम सुरू असलेल्या मेट्रोचा स्लॅब कोसळला. हा स्लॅब रिक्षेवर कोसळला असून बाजूने जाणाऱ्या कारचेही नुकसान झाले आहे. यात एका प्रवाशाचा मृत्यू झाला. तर 3 जण जखमी झाले आहेत.

मुलुंडमधील खासगी रुग्णालयात जखमींना दाखल करण्यात आले असून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार चार पैकी एकाचा रुग्णालयात आणेपर्यंत मृत्यू झाला होता.


रामधन यादव असे मृताचे नाव आहे. तर राजकुमार यादव (वय 45), महेंद्रप्रताप यादव (वय 52), दीपा रुहिया (वय 40) अशी जखमींची नावे आहेत. यातील राजकुमार यादव यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर उर्वरित दोघांची प्रकृती सध्या स्थिर आहे.

#### मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखाची मदत जाहीर

- **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलुंडमधील दुर्घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मुंबईतील मुलुंड भागात मेट्रो बांधकामाचा स्लॅब कोसळून झालेल्या दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून इतर काही जखमी झाले आहेत. या घटनेबद्दल चौकशीचे आदेश दिले आहेत. मृताच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकार देईल आणि जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करेल. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना.**
- **मुंबई महानगर विकास प्राधिकरण (MMRDA) ने मुलुंडमधील दुर्घटनेप्रकरपणी उच्चस्तरीय चौकशी समितीची नियुक्ती केली आहे. एमएमआरडीएचे संचालक (मेट्रो पीआययू) बसवराज एम. भद्रगोंड यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती चौकशी करणार आहे.**

## असंख्य शाळांमधील शिक्षकांची पदे धोक्यात!

**▸विदर्भ केसरी। अकोला :**



पटसंख्येच्या निकषावरील संचमान्यतेमुळे असंख्य शाळांमधील शिक्षकांची पदे धोक्यात आली आहेत. शिक्षकाविना शाळा हे धोरण अन्यायकारक ठरत असल्याची भूमिका विज्युक्टाने मांडली आहे. प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी गटनिहाय किमान तीन शिक्षक गरजेचे असून त्या दृष्टीने निर्णय घेण्याची मागणी विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ.अविनाश बोर्डे यांनी शिक्षण विभागाकडे केली आहे.

तुकडी निकषाऐवजी विद्यार्थी संख्येच्या आधारावर कार्यभार गणना करतांना त्यासाठीचे प्रचलित सर्व निकष व शासन आदेश अधिक्रमित करून १५ मार्च २०२४ च्या शासन आदेशात दिलेल्या पटसंखेच्या निकषानुसार संचमान्यता केली जात आहे. २००९ च्या शिक्षणाचा अधिकार या कायद्यानुसार पटसंख्येच्या प्रमाणात शिक्षकांची पदे भरली जात होती.

मात्र, शासनाच्या १५ मार्च २०२४ च्या आदेशानुसार त्यात बदल झाल्याने शिक्षण हक्क कायद्यातील निकष सुद्धा बाधित होत आहेत. यामुळे अनेक शाळा एकच किंवा शुन्य शिक्षकी होतील. ४० च्याऐवजी ३९ विद्यार्थी संख्या झाल्यास शुन्य शिक्षक अशी अवस्था निर्माण होईल. ग्रामीण भागातील अनेक शाळा शिक्षकाविना होतील.

राज्यात मोफत शिक्षण घेणाऱ्या शहरी तथा ग्रामीण शेतकरी मुलांना शिक्षकाशिवाय शिक्षण घ्यावे लागेल. ही बाब त्यांना शिक्षणापासून वंचित करणारी असून त्यांच्यावर अन्याय करणारी आहे, असा आरोप विज्युक्टाचे डॉ. अविनाश बोर्डे यांनी केला. प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी गटनिहाय किमान तीन शिक्षक असावेत, याबाबत तातडीने निर्णय व्हावा, अशी आग्रही मागणी त्यांनी शिक्षण विभागाला दिलेल्या निवेदनात केली आहे.

#### परीक्षा कार्यात शिक्षक व्यस्त; समायोजन प्रक्रिया थांबवा

- **२०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांची जिल्हास्तरावर समायोजनाची कार्यवाही ३ मार्चपर्यंत, तर २५ मार्चपर्यंत विभाग स्तरावर कार्यवाही करण्याचे निर्देश संचालकांनी ४ फेब्रुवारीच्या पत्रान्वये दिले आहेत. राज्यात १० फेब्रुवारीपासून मंडळाच्या लेखी परीक्षा सुरू झाल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा देखील सुरू आहेत. या सोबतच शिक्षकांना मंडळाच्या परीक्षांचे उत्तरपत्रिका तपासणीचे काम विहीत वेळेत पूर्ण करावे लागेल.**
- **दरम्यान, उर्वरित वर्गाच्या परीक्षा मुल्यमापन व निकाल हे काम सुद्धा आहे. त्यामुळे शिक्षक-शिक्षकेतरांची समायोजन प्रक्रिया तातडीने थांबवण्यात यावी, अशी मागणी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक पुणे यांना विज्युक्टाचे अध्यक्ष डॉ. अविनाश बोर्डे यांनी निवेदनाव्दारे**

## वारंवार लैंगिक अत्याचार केल्याने बारा वर्षाची मुलगी गर्भवती...

**▸विदर्भ केसरी। बुलढाणा :**

चिखली तालुक्यातील एका गावात जेमतेम १२ वर्षे ४ महिन्यांच्या अल्पवयीन मुलीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याने तीला गर्भधारणा झाल्याचे तपासणीत आढळून आले.

दरम्यान नको त्या वयात तिच्यावर वारंवार शारीरिक अत्याचार करून तिच्यावर मातृत्व लादणाऱ्या नराधम युवकांविरुद्ध पोलिसांनी भारतीय न्याय संहिता तसेच बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सागर शेषराव सुरडकर (वय २२, राहणार डोंगर खंडाळा, तालुका व जिल्हा बुलढाणा) असे आरोपीचे नाव आहे. मागील १५ जून २०२५ ते ८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान हा घृणास्पद घटनाक्रम घडला. आरोपीने पीडित मुलगी घरी एकटी असताना तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिल्याचे पुढे स्पष्ट झाले. या प्रकारामुळे अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिल्याचे पुढे स्पष्ट झाले. दरम्यान, पीडितेला पोटदुखीची तक्रार जाणवल्याने तिच्या आईने तिला दवाखान्यात नेले. वैद्यकीय तपासणीत मुलीला गर्भधारणा झाल्याचे समोर आल्यावर तिच्या आईला जबर मानसिक धक्का बसला . त्यानंतर मुलीने सांगितलेल्या माहितीनुसार १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी तक्रार दाखल करण्यात आली. गुन्हा नोंदविण्यास झालेला विलंब हा गर्भधारणा उघड झाल्यानंतरच प्रकार समोर आल्यामुळे झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४ (२) (एफ ), ६४(२)(एच ), ६४(२) (१), ६४(२) (एम ), ६५(२) तसेच बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा २०१२ मधील कलम ६, १०व १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक अश्विनी गाडे करीत आहे.संबंधिताविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी होत आहे.

दैनिक
विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ 

## अग्रलेख

# अखेर कोंडी फुटली..

सध्या डोनाल्ड ट्रम्प यांचे वागणे म्हणजे धनाढ्य घरातील उनाड मुलासारखे आहे. ज्याप्रमाणे साऱ्या वस्तीला, गावाला अशा उनाड मुलाचा त्रास मुकाट्याने सहन करावा लागत असतो, तीच परिस्थिती सध्या जगाची ट्रम्प यांच्या बाबतीत झाली आहे. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे अवघे जग घायकुतीला आहे. एवढेच नव्हे तर, खुद्द अमेरिकेतही प्रचंड खदखद आहे. कित्येकवेळा लक्षावधी अमेरिकन नागरिक रस्त्यावर उतरले आणि ट्रम्प प्रशासनाचा निषेध केला. पण, 'अमेरिका फर्स्ट' चा नारा देत आपलेच घोडे पुढे दामटणाऱ्या ट्रम्प यांना कुणाचेही सोयरसूतक राहिलेले नाही. त्यांच्यासाठी आता नैतिक-अनैतिक यांच्यातील फरक उरलेलाच नाही. ट्रम्प यांच्या व्यापारविषयक धोरणांमुळे जगातील पुरवठा विस्कळीत झाली. अनेक देशांवर जबर व्यापार शुल्क लादल्याने अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाले. जे युरोपीयन देश जागतिक राजकारणात अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून चालत आले आहेत, त्यांनाही ट्रम्प यांनी सोडले नाही. भारतालाही त्याचा चांगलाच फटका बसला. ५० टक्के व्यापार शुल्क आकारल्याने उद्योजकांची वाट कठीण झाली. समुद्री उत्पादने, कापड उद्योग, मोती व आणि चामडे उद्योगांना तोटा सहन करावा लागला. कारण, या उद्योगातील उत्पादनांची अमेरिकेत मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. अमेरिकेने आकारलेल्या जशास तसे (रेसिप्रोकल टॅरिफ) शुल्काचा विपरित परिणाम होऊन नोकर कपातीची वेळ अनेक लघुउद्योगांवर आली. पण, भारत सरकारने हे प्रकरण संयमाने हाताळत अमेरिकेमुळे होणारी व्यापार तुट भरून काढण्यासाठी तिसऱ्या जगातील देशांकडे मोर्चा वळविला. चीनप्रमाणे भारताने अमेरिकेसोबत व्यापार शुल्क युद्धात न पडता 'वेट अण्ड वॉच'ची भूमिका घेतली. याच दरम्यान ब्रिटन, न्यूझीलंड, ओमान या देशांबरोबर आणि युरोपीयन युनियनसोबत मुक्त व्यापार करार करीत भारताने अमेरिकेवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने पाऊल टाकले. भारताने घाईगडबडीत निर्णय न घेता आफ्रिका, युरोप आणि लॅटिन अमेरिकेतील देशांकडे आपला वळविला. भारत बधत नसल्याचे आणि कुठलीही प्रतिक्रिया देत नसल्याचे पाहून ट्रम्प प्रशासन अस्वस्थ झाले. जवळपास सहा महिने ५० टक्के व्यापार शुल्काचा भार सहन करीत भारताने ट्रम्प यांना चर्चेच्या टेबलावर येण्यास भाग पाडले. सध्याचे जग हे एकमेकांशी जुळलेले आहे. प्रत्येक देश इतर देशांवर कशासाठी तरी अवलंबून असतो. अमेरिका स्वतःला कितीही आणि शक्तिशाली समजत असला तरी त्यालाही चीन, रशियासोबत व्यापार करावाच लागतो. डोकलाम, गलवानच्या घटना होऊनही भारत-चीन यांना जवळ यावेच लागले. कारण, कोणताही देश कायमस्वरूपी एकटा राहू शकत नाही. दीर्घ द्वेष बाळगू शकत नाही. सध्याच्या बहुध्रुवीय जगात शत्रुत्व हे कधीच कायम जपायचे नसते. जगाच्या विकासासाठी संवाद व शांततेची नितांत गरज भारताला डिवचण्यासाठी ट्रम्प गेली सहा महिने विविध प्रकारची विधाने करीत आले. प्रसंगी पाकिस्तानलाही कुरवाळले, आर्थिक मदतही केली, पण भारताने त्यावर कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही. दुसरीकडे भारत-अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी चर्चा करीतच होते. अखेर ऑगस्ट २०२५ पासून सुरू असलेली व्यापार कोंडी फुटली आणि दोन्ही देश मुक्त व्यापार करारावर सहमत झाले. ५० असलेले व्यापार शुल्क १८ टक्क्यांवर आले. आता या करारावर देशभरात चर्चा रंगली आहे. मोदी सरकार ट्रम्प यांच्यासमोर झुकल्याचा आरोप विरोधकांनी सुरू केला आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गदारोळही झाला. करारातील मुद्यांवर दोन्ही बाजूंनी काहीशी संदिग्धता असला, तरी प्रथमता व्यापार कोंडी फोडणे आवश्यक आहे. कारण, देशाच्या प्रमुखाचे काम हे जनतेला होणार नाही, याची काळजी घेण्याचे असते. मेरिका हा कोडगा, स्वार्थी आणि मतलबी देश आहे. तेवढाच पळपुटा आणि घाबरटही आहे. इतिहासात डोकावले असता या देशाने कधीही स्वबळावर एकही युद्ध जिंकले नाही. रशिया अथवा चीनसोबत कधीही तो थेट भिडला नाही. उलट, व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानातून पाठ दाखवून पळून जाण्याची नामुष्की अमेरिकेवर आली. शक्तिशाली समजणारी अमेरिका केवळ अफगाणिस्तान, इराक, सीरिया, व्हेनेझुएला यासारख्या गरीब आणि दुर्बल देशांविरोधात दंड थोपटत असते. भारताविरोधातही कुरापती करीत असते. तरीही तो देश एक महाशक्ती आहे हे नाकारता येत नाही. व्यापार शुल्काच्या माध्यमातून दोन्ही देशांमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेला तणाव निवळण्यास सुरुवात झाली हे चांगलेच झाले. अर्थात्, भारताने भूमिका घेत राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडविल्याने हे शक्य झाले. काहीही असले तरी, अमेरिका आजही जगातील आर्थिक आणि लष्करी महाशक्ती आहे, हे मान्य करावे लागेल. दोन दिवसांपूर्वी शनिवारी व्यापार आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी दिल्लीत पत्रपरिषद घेऊन व्यापार करारातील मुद्यांची माहिती दिली. व्यापार शुल्क ५० वरून १८ टक्के खाली आणल्याने म्हटले तरी भारताला बराच दिलासा मिळणार आहे. आज भारतीय अर्थव्यवस्था चार ट्रिलियन डालर्स तर अमेरिकेची तब्बल ३० ट्रिलियन डालर्स एवढी महाकाय आहे. या करारामुळे भारतीय उत्पादकांना अमेरिकेची विशाल बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. भारताची १४० कोटींची विशाल लोकसंख्या ही आज आपली जमेची बाजू ठरत आहे आणि एवढ्या विशाल ग्राहकांच्या बाजारपेठेवर नजर असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे दोन्ही देशातील व्यापाऱ्याना परस्पर फायदा करून देणारा हा व्यापार करार आहे. तथापि, भारताने अमेरिकेला रान मोकळे करून दिले, असे मुळीच नाही. खुद्द व्यापार मंत्री गोयल यांनी कृषी आणि दुग्ध क्षेत्रात अमेरिकेला शिरकाव करू दिला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. ग्रामीण भारत हा आपल्या अर्थव्यवस्थेचा आहे.

# भूसंपादनाला गती

**आता जमिनीच्या संपादनाचा अंतिम निवाडा, भरपाईची रक्कम आणि संपूर्ण कार्यवाहीचा सारांश जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक केले आहे.**



भूसंपादन ही कोणत्याही राष्ट्राच्या विकास प्रक्रियेतील अत्यंत पायाभूत आणि तितकीच संवेदनशील बाब मानली जाते. रस्ते, रेल्वे, धरणे, औद्योगिक वसाहती आणि नागरी सुविधांच्या उभारणीसाठी जमिनीची आवश्यकता असते आणि ही जमीन बहुतांश वेळा शेतकऱ्यांकडून किंवा खासगी मालकांकडून घेतली जाते. भूसंपादनाचे महत्त्व अनन्यसाधारण असले तरी, त्याभोवती असलेले वादाचे वलय आणि प्रशासकीय गुंतागुंत यामुळे हा विषय नेहमीच चर्चेत राहिला आहे.

पुण्यातून समोर आलेल्या ताज्या निर्णयानुसार, आता भूसंपादनाचा अंतिम निवाडा आणि भरपाईची रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक झाले आहे. हा निर्णय केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, तो पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. भूसंपादनाचा इतिहास पाहिला तर आपल्याला ब्रिटिशकालीन वारशाकडे वळावे लागते.

भारतामध्ये दीर्घकाळ 1894 चा भूसंपादन कायदा अस्तित्वात होता. या कायद्याचा मुख्य उद्देश हा वसाहतवादी शासनाला हव्या असलेल्या प्रकल्पांसाठी सक्तीने जमीन अधिग्रहित करणे हा होता. या जुन्या कायद्यात 'सार्वजनिक प्रयोजन' या संज्ञेची व्याप्ती मोठी होती, परंतु त्या बदल्यात मिळणारी भरपाई आणि विस्थापितांचे पुनर्वसन या बाबींकडे दुर्लक्ष केले गेले होते.

स्वातंत्र्यानंतरही अनेक दशके याच कायद्याच्या आधारे काम चालले, ज्यामुळे शेतकरी आणि सरकार यांच्यात मोठे संघर्ष निर्माण झाले. अनेक प्रकल्प हे केवळ भूसंपादनातील कायदेशीर पेच आणि मोबदल्यातील अन्यायामुळे रखडले. जमिनीची बाजारभावाप्रमाणे किंमत न मिळणे, पुनर्वसनाची ठोस हमी नसणे आणि निर्णय प्रक्रियेत जमिनीच्या मालकाचा सहभाग शून्य असणे या जुन्या धोरणातील प्रमुख त्रुटी होत्या.

या पार्श्वभूमीवर 2013 मध्ये केंद्र सरकारने 'भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित मोबदला मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क कायदा' संमत केला. या कायद्याने भूसंपादनाच्या प्रक्रियेत मानवी चेहरा आणण्याचा प्रयत्न केला. जमिनीच्या मोबदल्यात भरघोस वाढ, सामाजिक परिणामांचे मूल्यांकन आणि बाधित लोकांच्या संमतीला महत्त्व अशा तरतुदी यामध्ये करण्यात आल्या.

महाराष्ट्रातही या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना स्थानिक पातळीवर अनेक अडचणी येत होत्या. शेतकऱ्यांना आपल्या जमिनीचा निवाडा किती झाला, त्याला किती पैसे मिळणार आणि त्याच्या जमिनीचा ताबा कधी घेतला जाणार, या माहितीसाठी तहसील किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असत. माहिती अधिकार कायद्याचा वापर करूनही अनेकदा ही माहिती वेळेत मिळत नसे.भूसंपादनातील समस्यांचा विचार केल्यास माहितीचा अभाव ही सर्वात मोठी समस्या ठरते. जेव्हा एखादा प्रकल्प जाहीर होतो, तेव्हा दलाल आणि मध्यस्थ सक्रिय होतात. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीची खरी किंमत माहीत नसल्याचा फायदा हे मध्यस्थ घेतात. याशिवाय, सरकारी दप्तरी होणारा विलंब आणि सातबारा उताऱ्यावर वेळेत नोंदी न होणे यामुळे कायदेशीर गुंतागुंत वाढते.

अनेकदा भूसंपादन होऊनही कागदोपत्री मालकी बदलत नाही, त्यामुळे नंतरच्या काळात जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार होऊन फसवणुकीचे प्रकार घडतात. इतर राज्यांच्या धोरणांचा विचार केल्यास, हरियाणा आणि तेलंगणा सारख्या राज्यांनी भूसंपादनासाठी ऑनलाइन पोर्टल विकसित केली आहेत. तिथे जमिनीच्या मालकांना थेट त्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचा संदेश मिळतो आणि सर्व कागदपत्रे सार्वजनिक उपलब्ध असतात. महाराष्ट्राने आता याच धर्तीवर पाऊल उचलले असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर सर्व निवाडे प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या निर्णयाचा सर्वात मोठा सकारात्मक परिणाम म्हणजे प्रक्रियेतील पारदर्शकता होय. आता कोणताही शेतकरी आपल्या गावच्या किंवा प्रकल्पाच्या नावानुसार शोध घेऊन आपल्या जमिनीचा निवाडा डाउनलोड करू शकेल. त्याला नेमकी किती रक्कम मंजूर झाली आहे, हे घरी बसून मोबाइलवर पाहता येईल. यामुळे सरकारी कार्यालयातील हेलपाटे थांबतील आणि मध्यस्थांची साखळी मोडीत निघेल. तसेच, जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत निवाड्याची प्रत महसूल अधिकाऱ्यांकडे पाठवणे बंधनकारक केल्यामुळे प्रशासकीय गतिमानता वाढेल. सरकारी मालकीची नोंद सातबारावर वेळेत झाल्यामुळे भविष्यातील वादांना पूर्णविराम मिळेल. विशेष म्हणजे, केवळ नवीनच नव्हे तर 1894 च्या जुन्या कायद्यानुसार झालेल्या संपादनाचे उपलब्ध रेकॉर्डही स्कॅन करून संकेतस्थळावर टाकण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

यामुळे भूसंपादनाचा एक डिजिटल इतिहास तयार होईल. ज्यांच्या जमिनी पिढ्यान्पिढ्या प्रकल्पांत गेल्या आहेत, त्यांना आपल्या हक्काची माहिती मिळवणे सोपे होईल. पारदर्शकतेमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास वाढेल आणि विकास प्रकल्पांना होणारा विरोध कमी होण्यास मदत होईल. माहिती तंत्रज्ञानाचा हा वापर खऱ्या अर्थाने लोकशाहीत सामान्य नागरिकाला सक्षम करणारा ठरेल.राज्याच्या महसूल व वन विभागाने घेतलेला हा निर्णय महसूल प्रशासनातील एक मोठी सुधारणा असून, यामुळे शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास, भूसंपादन ही प्रक्रिया त्रासदायक न ठरता विकासाचे एक सुसह्य माध्यम बनेल यात शंका नाही.

# बेगमांच्या बेबंदशाहीनंतरची बेगमी...

लोकशाहीस अपेक्षित असा मध्यममार्गी नेमस्तपणा तारिक रहमान यांनी बांगलादेश निवडणुकीच्या प्रचारात तरी दाखवलेला असल्याने त्यांचा विजय तूर्त आशादायी...


बांगलादेशात तब्बल सात वर्षांनंतर तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली खऱ्या अर्थाने लोकनिर्वाचित सरकार अस्तित्वात आले ही बाब त्या देशासाठीच नव्हे, तर भरतखंडासाठीही स्थैर्यजनक आणि उपकारक. सात वर्षांनंतर अशासाठी, कारण सन २०२४ मध्ये झालेली निवडणूक ही तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या एकाधिकारशाहीमुळे आणि त्यातून संतप्त झालेल्या विरोधकांच्या बहिष्कारामुळे शुद्ध फार्स ठरली. या बेबंदशाहीची शिक्षा शेख हसीना यांना मिळालीच. कारण नंतर पुढच्याच वर्षी जुलै महिन्यात विद्यार्थी आणि बेरोजगारांच्या संतापाचा विस्फोट झाला. पोलीस आणि प्रशासनही हसीनांना साथ देईनासे झाले. आंदोलन सुरू झाल्यानंतर अवघ्या काही आठवड्यांत देश सोडून भारतात पळून जाण्याची वेळ बेगम हसीनांवर आली. नंतरच्या काळात विद्यार्थी नेते आणि मोजक्या सुजाणांनी एकत्र येऊन हंगामी सरकार स्थापले नि फेब्रुवारी २०२६ पर्यंत निवडणुका घेऊन नवीन लोकनिर्वाचित सरकार स्थापण्याचा वादा त्या हंगामी सरकारचे प्रमुख सल्लागार, नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ मोहम्मद युनूस यांनी केला. काही त्रुटींचा अपवाद वगळता हे आश्वासन हंगामी सरकारने पाळून दाखवले याबद्दल ते अभिनंदनपात्र ठरतात. हसीनांच्या सत्तांधळेपणाचा फटका अवामी लीग या त्यांच्या पक्षास बसला आणि गतवर्षी त्याची मान्यताच रद्द झाली. परिणामी बांगलादेशच्या राजकारणातील एक प्रमुख विचारप्रवाह असलेल्या या पक्षास यंदाच्या निवडणुकीपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे मतदारांचा कौल खऱ्या अर्थाने प्रातिनिधिक समजावा का, मतदारांना पुरेसे पर्याय उपलब्ध होते का असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्यांची उत्तरे शोधण्याची ही वेळ नव्हे. युवा विद्यार्थ्यांचा नॅशनल सिटिझन्स पार्टी (एनसीपी) हा नवथर पक्ष, बांगलादेशच्या निर्मितीसच विरोध असलेला जमाते इस्लामी हा रूढीवादी पक्ष आणि त्यातल्या त्यात मध्यममार्गी म्हणता येईल असा बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) हा पक्ष असे तीन प्रमुख पर्याय मतदारांसमोर होते. मतदारांनी तिसरा पर्याय निवडून विद्यमान विस्कळीत परिस्थितीत स्थैर्य आणि अनुभवाला पसंती दिली. तारिक रहमान हे बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान खालेदा झिया यांचे चिरंजीव. गेल्या डिसेंबर महिन्यात खालेदा मृत्युशय्येवर होत्या त्या वेळी तारिक बांगलादेशात परतले. त्यानंतर काही दिवसांतच खालेदा यांचा मृत्यू झाला, मात्र त्यापूर्वीच बीएनपीने तारिक रहमान यांना खालेदांचा वारसदार मानून पक्षाची सूत्रे त्यांच्या हाती सोपवली. त्यांनी केलेल्या सुरुवातीच्या भाषणांमध्येच बीएनपीने मध्यममार्गाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले. प्रत्येक आईच्या स्वप्नातला बांगलादेश आम्ही बनवू, अशी भावनिक साद त्यांनी मतदारांना घातली. निवडणुकांच्या वातावरणात हे अपरिहार्यच. तरीही तारिक रहमान यांची प्रचारकाळातील दोन विधाने त्यांची राजकीय परिपक्वता दर्शवतात. डोंगराळ भागातील, मैदानी प्रदेशातील मुस्लीम, हिंदू, बौद्ध, ख्रिस्ती मतदारांनी आपल्याला सुरक्षित आणि सर्वसमावेशक बांगलादेश घडवण्यासाठी साथ द्यावी, हे आवाहन विशेषतः तेथील हिंदू अल्पसंख्याकांसाठी आश्वासक ठरले. त्याचबरोबर, 'आमचे धोरण बांगलादेशकेंद्री असेल. दिल्ली आणि रावळपिंडीधार्जिणे नसेल' ही घोषणा मांडलिकत्वाच्या राजकारणाविषयी तिटकारा व्यक्त करणारी ठरली. याचीही नोंद मतदारांनी घेतलेली दिसते.

हे दुसरे विधान अत्यंत महत्त्वाचे. कारण बांगलादेशाच्या अस्तित्वानंतर साडेपाच दशके उलटल्यानंतरही हा देश भारत आणि पाकिस्तान यांच्या सावलीबाहेर पडण्यासाठी धडपडत आहे. भारताविषयी उपकृत भावना जशी शाबूत आहे, तशीच (पूर्व) पाकिस्तानी अस्मिताही जागृत आहे. या दोन्ही चौकटींबाहेर स्वतंत्र बांगला अस्मिता चिरंतन ठेवण्याचा प्रयत्न नेतृत्वाकडून पुरेसा झालाच नाही. बेगम खालेदा झिया आणि शेख हसीना यांच्या अनुक्रमे बीएनपी आणि अवामी लीग या पक्षांनी या देशावर गेली ३५ वर्षे आलटून पालटून राज्य केले. त्यांच्या धोरणाला कधी भारतवादाची तर कधी पाकिस्तानधार्जिणेपणाची किनार राहिली. खालेदांच्या बीएनपीने याआधी दोन वेळा सत्तेवर असताना, म्हणजे १९९१-९६ आणि २००१-०६ या काळात सत्तास्थापनेसाठी जमाते इस्लामीची मदत घेतली. जमातने कधीही बांगलादेशाच्या निर्मितीला निःसंदिग्ध पाठिंबा दिला नाही आणि हा पक्ष नेहमीच पाकिस्तानशी निष्ठावान राहिला. खालेदांच्या विरोधक शेख हसीना यांनी या धोरणावर उतारा म्हणून भारताला पसंती दिली. त्या २००९ ते २०२४ असा प्रदीर्घ काळ सत्तेवर होत्या. त्याआधीही १९९६-२००१ या काळात त्या पंतप्रधान होत्या. याचाच अर्थ हे दोन्ही पक्ष आपापल्या राजकारणाचा भाग म्हणून भारत आणि पाकिस्तानशी मैत्रीचा जुगार खेळत राहिले. तो कधी फळला, कधी त्याने मातेरे केले. बांगलादेशी राजकारणाचा हा पोत बदलण्याची संधी तारिक रहमान यांना चालून आली आहे. 'जातीय संसद' या कायदेमंडळात त्यांच्याकडे घसघशीत बहुमत आहे. जनतेचा कौल आहे. बांगलादेशाच्या राजकारणाचा अविभाज्य घटक बनलेल्या दोन्ही बेगमांपैकी एक हयात नाही, एक परागंदा झाली आहे. यामुळे निर्माण झालेला अवकाश तारिक रहमान यांच्यासाठी तारक ठरू शकतो, तसाच मारकही. लोकशाही संवर्धनाच्या बाबतीत या देशाने पाकिस्तानपेक्षा अधिक सुजाणपणा दाखवलेला असला, तरी राजकीय विरोधकांना जिवे संपवण्याचा रक्तलांच्छित इतिहास पाकिस्तानसारखाच याही देशाचा आहे. बांगलादेशाच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे शेख मुजीबुर रहमान असोत किंवा झिया उर रहमान असोत, यांना नैसर्गिक मृत्यू लाभला नाही. कारण लोकशाही पद्धतीने निवडणुका लढवल्या नि त्या जिंकल्या याचा अर्थ लोकशाही शहाणपण रुजले असा होत नाही. लोकशाही ही व्यवस्थांच्या निःपक्षपातीपणातून दिसून येते, धर्मनिरपेक्ष आणि वंशनिरपेक्ष धोरणांतून प्रकटते, अल्पसंख्याकांच्या उत्थानातून साजरी होते. तारिक रहमान यांनी लोकशाहीस अपेक्षित असा मध्यममार्गी नेमस्तपणा दाखवलेला आहे. त्यामुळे त्यांचा विजय तूर्त आशादायी वाटतो. बांगलादेशातील बदलत्या वाऱ्यांची नोंद भारताने काहीशा उशिराने घेतलेली आहे, ते योग्यच. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रहमान यांच्याशी दुःखद आणि सुखद अशा दोन्ही प्रसंगी संवाद साधला आणि नवीन राजकीय व्यवस्थेशी जुळवून घेण्यात पुढाकार घेतला. पण हे जुळवून घेणे शेख हसीना या एका व्यक्तीभोवती केंद्रित असेल. हसीनांना सोपवावे ही मागणी तारिक रहमान यांनी भारताकडे अनेकदा केलेली आहे. आजवर मोहम्मद युनूस यांच्या सरकारच्या अशाच मागणीकडे ते 'हंगामी' सरकार असल्याचे मानून दुर्लक्ष करता आले. ती सोय आता राहिलेली नाही. किंबहुना, तारिक रहमान यांच्या सरकारशी संबंध प्रस्थापित करायचे असतील, तर शेख हसीनांविषयी काहीतरी ठोस निर्णय भारत सरकारला घ्यावाच लागेल. हे होत नाही तोवर हजारो बांगलादेशींच्या मनात भारताविषयीचा राग एखाद्या गळूसारखा ठसठसत राहील. या दुखऱ्या अवस्थेचा फायदा घेण्यासाठी पाकिस्तान आणि चीन टपून बसले आहेतच. 'हंगामी' असूनही युनूस यांच्या सरकारने पाकिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतले. आता तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धात आपल्यासाठी बांगलादेश हा डोईजड ठरू शकेल असा प्रतिस्पर्धी बनला आहे. हे सगळे सुरू असताना, बांगलादेशाशी संवाद, सौहार्द वाढवायचे असेल तर तेथील सरकारच्या नि लवकरच कायदेमंडळाच्या प्रमुख मागणीकडे दुर्लक्ष करणे मैत्रीच्या शक्यतांमध्ये माती कालवण्यासारखे ठरेल.

दोन बेगमांच्या बेबंदशाहीनंतर निर्माण झालेल्या पोकळीत बांगला मतदारांनी लोकशाहीच्या पारड्यात कौल दिला आहे. त्या स्थैर्याचा उचित लाभ भावी काळात मिळवण्यासाठीची बेगमी भारतानेही आतापासून करणे बरे.

# महाराष्ट्रात थंडीला निरोप...

**राज्यात गेल्या काही दिवसांपासून हवामानात लक्षणीय बदल जाणवत असून थंडीने आता काढता पाय घेतल्याचे चित्र आहे. वाऱ्यांची दिशा बदलल्यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत असून महाराष्ट्रात उन्हाळ्याची चाहूल फेब्रुवारीतच तीव्रपणे लागली आहे.**




हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार येत्या काही दिवसांत तापमानवाढ कायम राहणार असून विशेषतः कोकण पट्ट्यासह मुंबईत उष्ण आणि दमट हवामानाचा तडाखा बसणार आहे. याच पार्श्वभूमीवर यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

सध्या राज्यातील काही भागांमध्ये कमाल तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड जिल्ह्यांत उष्म्याची तीव्रता अधिक जाणवू लागली आहे. घाटमाथ्यावरील हिरवळ कमी होत चालली असून मे महिन्यात जाणवणारा रखरखाट यंदा फेब्रुवारीपासूनच अनुभवायला मिळत आहे. मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरातही उकाडा वाढत असून पुढील २४ तासांत उष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे आठवड्याच्या सुट्ट्यांचे नियोजन करतानाही नागरिकांनी उष्णतेचा विचार करावा, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोकण आणि विदर्भातील अनेक भागांत शुक्रवारी कमाल तापमानात वाढ नोंदवण्यात आली. पुढील दोन ते तीन दिवसांत कोकण पट्ट्यासह विदर्भातील काही भागांत तापमान आणखी वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. विशेषतः कोकणातील कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होऊ शकते, त्यानंतर किंचित घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातही तापमान उष्णतेच्या दिशेने सरकत असल्याने राज्यात उन्हाळ्याची खरी सुरुवात झाल्याचे मानले जात आहे. फेब्रुवारीतच अशी स्थिती असल्याने एप्रिल-मे महिन्यातील संभाव्य उष्णतेची कल्पना करत नागरिक चिंतित झाले आहेत.

दरम्यान, (आयएमडी) च्या माहितीनुसार पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली, बिहार, झारखंड, ओडिशा, राजस्थान आणि महाराष्ट्राच्या काही भागांवर अद्यापही गार वाऱ्यांचा प्रभाव कायम आहे. त्यामुळे पहाटे आणि रात्री उशिरा किंचित गारठा जाणवू शकतो. मात्र दक्षिणेकडील Kerala, Goa आणि कोकण किनारपट्टी भागात उष्ण वाऱ्यांचा प्रभाव वाढत असून उकाडा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.एकूणच, वाऱ्यांच्या बदलत्या दिशेमुळे महाराष्ट्रातील हवामानाने अचानक कलाटणी घेतली असून येत्या काही दिवसांत उष्णतेचा जोर कायम राहणार असल्याचे चित्र आहे. नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



# मेट्रो अपघातात यूपीचा सरपंच ठार!

**▸विदर्भ केसरी। मुलुंड,**

मुंबईतील मुलुंड (पश्चिम) परिसरात शनिवारी दुपारी मेट्रो बांधकामादरम्यान गंभीर अपघात झाला. एलबीएस रोडवरील बांधकामात असलेल्या मेट्रो पिलरचा सिमेंटचा तुकडा अचानक खाली कोसळला आणि तो रस्त्यावरून जात असलेल्या ऑटो रिक्षा व एका कारवर पडला.

ही घटना जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ घडली. अपघाताची माहिती सुमारे दुपारी १२.२० वाजता संबंधित यंत्रणांना मिळाली. या दुर्घटनेत ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या तीन ते चार जण जखमी झाले, त्यापैकी रिक्षातील सरपंच रामधन यादव यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मृत सरपंच उत्तर प्रदेशातील जौनपुर जिल्ह्याचे रहिवासी होते. अपघाताच्या वेळी ते नातेवाईकाच्या लग्नासाठी मुंबईत आले होते आणि मित्राच्या दुकानातून रिक्षा घेऊन जात होते. माजी सरपंच महेंद्र यादवही त्यांच्यासोबत होते.

जखमींवर मुलुंडमधील उपासनी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. मुंबई महापौर रितू तावडे आणि उपमहापौर संजय घाडी घटनास्थळी पोहोचले. उपमहापौराने सांगितले की, मेट्रोचे अधिकारी कर्मचारी दोषी असल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आणि चौकशीचे आदेश दिले आहेत. मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत दिली जाईल तर जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार उचलेल. त्यांनी जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होण्याची प्रार्थना केली आहे. मुंबईत ही घटना संपूर्ण परिसरात धक्कादायक ठरली असून, प्रशासनाने घटनेची सखोल चौकशी सुरू केली आहे.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ 

GOOD MORNING कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## कर्ज वसुलीसाठी आलेल्या महिलेला मारहाण

■ यवतमाळ : कर्जवसुलीसाठी आलेल्या एक महिलेला दोन इसमांनी मारहाण केल्याची घटना सावळी सदोबा येथे १३ फेब्रुवारीला घडली. शेख पप्पू शेख अय्याज (३४) रा. महालक्ष्मी वार्ड आदिलाबाद या आपल्या उसनवारीचे एक हजार रुपये वसूल करण्यासाठी सावळी सदोबा येथे सुरेखा बोटरे या महिलेकडे आल्या होत्या. तिच्या घरी जाऊन तिला आवाज दिला असता संतोष रघुनाथे नेवारे (३८) आणि रघुनाथे नेवारे (५६) दोघेही रा. सावळी सदोबा हे दोघे तेथे आले व त्यांनी आपल्याला मारहाण केली, अशी फिर्याद शेख पप्पू शेख अय्याज यांनी पारवा पोलिसात दाखल केली आहे. त्यावरुन पोलिसांनी दोघांवर गुन्हा नोंदविला आहे

# तंत्रज्ञानासह वीज बचतीचा संदेश

## वीज ग्राहकांच्या जागृतीसाठी ढाणकीत महावितरणची धडाकेबाज 'जनजागृती रॅली'

▸विदर्भ केसरी। ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकटे





वीज ग्राहकांमध्ये शासनाच्या विविध योजनांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वीज देयकांच्या नियमित भरण्याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी, महावितरणच्या वतीने आज, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी ढाणकी शहरात भव्य 'जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान आणि वीज बचतीचा संदेश घरोघरी पोहोचवण्यात आला.

महावितरण उपकार्यकारी अभियंता जाधव साहेब, ढाणकी सहाय्यक अभियंता राहुल नाकले, साखरा सहयक अभियंता पवन गिरी, माजी सहाय्यक अभियंता अनिल वानखेडे , संजय पडोळे , गजानन राजटकर, चंद्रभान बाभळे , सय्यद रफिक , रवींद्र दवणे, सुनील कांबळे, कृष्णा गायकवाड, कृष्णा कत्तुलवाड, आठवले मॅडम, सय्यद सलीम, काळबांडे साहेब, सुरोशे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली काढण्यात आली व इतर कर्मचारी उपस्थित होते शहराच्या मुख्य भागातून निघालेल्या या मोटरसायकल रॅलीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. महावितरणच्या सर्व स्तरांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या रॅलीदरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना नियमित वीज बिल भरणा: अखंडित वीज पुरवठ्यासाठी वीज बिलाचा वेळेवर भरणा करणे कसे आवश्यक आहे, याबाबत आवाहन करण्यात आले. भविष्यात येणाऱ्या स्मार्ट मीटर प्रणालीमुळे ग्राहकांना होणारे फायदे आणि पारदर्शकता यावर प्रकाश टाकण्यात आला, बिलातून कायमस्वरूपी सुटका मिळवण्यासाठी शासनाच्या 'सोलर रूफ टॉप' योजनेची माहिती देऊन जास्तीत जास्त नागरिकांनी सौर ऊर्जेचा वापर करावा, असे सांगण्यात आले.,

वीज वापरताना घ्यायची सुरक्षितता आणि विजेचा अपव्यय टाळून राष्ट्रीय बचत कशी करता येईल, याचे मार्गदर्शन करण्यात आले. शहरातील प्रमुख मार्गावरून फिरताना "वीज वाचवा - देश वाचवा", "नियमित बिल भरा - सहकार्य करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महावितरणच्या या उपक्रमाचे ढाणकी शहरातील नागरिकांनी स्वागत केले असून, अशा उपक्रमांमुळे ग्राहक आणि महावितरण यांच्यातील संवाद वाढण्यास मदत होईल, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## महत्त्वाचे

### महीलांनी माता रमाईचा वारसा पुढे चालवावा के के पाईकराव

▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर



मा. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचा त्याग आणि समर्पित कार्य हेच आमच्या जीवनाचे सोने आहे. हे आजच्या सर्वच रमाईच्या लेकींनी स्मरण करून रमाईच्या विचाराचा वारसा समर्थपणे चालवावा, असे प्रतिपादन के के पाईकराव आपले विचार व्यक्त करतांना सांगीतले . ते पुढे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना माता रमाईची खंबीर साथ आणि सहकार्य लाभल्यामुळे उपेक्षितांच्या जीवनोत्थानासाठी त्यांनी समाजीक कार्य हाती घेतले तेव्हा माता रमाई हि ख-या अर्थाने बहुजनाची माता झाली त्यामुळे समस्त महीलांनी माता रमाईचा वारसा पुढे चालवावा असे आवाहन त्यांनी व्यासपीठावरुन केले कार्यक्रमाचे आयोजन नालंदा बहुउद्देशीय बुद्ध विहार समिती व रमाई बहुउद्देशीय महिला मंडळ आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ७/२/२०२६ रोजी के के पाईकरांच्या घरी रमाई जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भारत बन्सोड तर प्रमुख पाहुणे म्हणून भोजराज लोखंडे उपस्थित होते नंतर रमाई बहुउद्देशीय महिला मंडळाचे अध्यक्ष लताबाई बनसोड सचिव रमाबाई नगराळे व तसेच कोषाध्यक्ष रमाबाई तामगाडगे यांनी प्रथम माता रमाईच्या तैलचित्राला पुष्प पुष्प अर्पण करुन अभिवादन केले यावेळी सखुबाई पाईकराव त्रिशला पाईकराव नमिता लोखंडे रेणूबाई कांबळे रमाबाई नगराळे कांचनमाला नगराळे बेबीबाई कांबळे रेशमा कांबळे रमाबाई तामगाडगे सज्जना नगराळे अलका वाकोडे सुरेखा लढे इंदुबाई कांबळे संध्या मोनेश्वर सुमनबाई मनवर ज्ञानेश्वर मेश्राम यादवराव जाधव दिगंबर नाईक ईत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती संतोष नगराळे हिने केले तर आभार प्रदर्शन गौतम उद्धवराव तामगाडगे यांनी केले

### श्री.म.द भारती विद्यालय ( मुख्य शाखा ) आर्णी येथील स्काउट्स राज्यपुरस्कारास पात्र

▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर



महाराष्ट्र राज्य भारत स्काउट्स आणि गाईड्स संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या शैक्षणिक सत्र 2025 -26 राज्यस्तरीय राज्य पुरस्कार चाचणी परीक्षेचा निकाल नुकत्याच लागला .श्री महंत दत्तराम भारती विद्यालय ( मुख्य शाखा) मधील स्काऊट अनिकेतसिंग अजयसिंग सोमवंशी ,आदित्य राजेंद्र मांगे या स्काऊटनी उल्लेखनीय यश संपादन करीत राज्यस्तरीय राज्य पुरस्कारास पात्र होण्याचा मान मिळवला. हा पुरस्कार मानवतेची सेवा व विश्वबंधुत्वासाठी एक महत्त्वाचा मानबिंदू आहे. या स्काऊट्स ला स्काऊट्स मास्टर श्री ए.डी. मानगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. स्काऊट मास्टर एम. एस. राठोड तसेच व्हि.बी. रेगुलवार यांनी सहकार्य केले.आज पर्यंत स्काऊट मास्टर श्री.ए.डी.मानगावकर यांच्या मार्गदर्शनात विद्यालयाला एकूण 50 राज्य पुरस्कार आणि 10 राष्ट्रपती पुरस्कार मुलांना मिळाले. तसेच शाळेची उज्वल यशाची परंपरा आजही कायम आहे. संस्थेचे सचिव मा. ॲड.सिद्धार्थजी भारती साहेब यांनी स्काऊट्सचा सन्मान केला व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री. दत्त प्रसादिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा मा.डॉ. किरणताई भारती, कोषाध्यक्ष मा.प्रियदर्शनजी भारती साहेब, उपाध्यक्ष इंजिनीयर मा. समृद्धजी भारती साहेब, संचालिका मा.अश्विनीताई भारती, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.ए. डी.जगताप सर, उपमुख्याध्यापक श्री. नन्नावरे सर, पर्यवेक्षक श्री.वानखडे सर, श्री.नामदेववार सर यांनी अभिनंदन केले तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

### तहसील परिसरात हरवलेली ४० हजारांची पिशवी प्रामाणिकपणे केली परत

▸विदर्भ केसरी। आर्णी प्रतिनिधी:बबिता शिवणकर

लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या प्रामानिकपनाचे होत आहे कौतुक वर्दळीमुळे गजबजलेल्या तहसील कार्यालय परिसरात प्रामाणिकपणाचे दर्शन घडविणारी घटना आज घडली आहे. वरुड भक्त येथील रहिवासी तथा माजी सरपंच सुरेश पांडुरंग काळे यांची तब्बल ४० हजार रुपये रोख रक्कम असलेली पिशवी तहसील कार्यालय परिसरात आज हरवली होती. ही पिशवी लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता आपली सामाजिक जबाबदारी ओळखून सदर पिशवी तात्काळ तहसील प्रशासनाकडे सुपूर्द केली. पिशवी कोणाची आहे यांची तहसिल दाराने खातर जमा करुन सुरेश काळे यांच्या ताब्यात दीली. यावेळी तालुका दंडाधिकारी वैशाख वाहूरवाघ, नायब तहसीलदार उदय तूंडलवार, नायब तहसीलदार एस. एस. अदमुलवार यांच्यासह आर्णीतील पत्रकार प्रमोद कुदळे,राजेश माहेश्वरी रशिद मलनस मनोज माघाडे उपस्थित होते. मोठी रक्कम प्रामाणिकपणे परत मिळाल्याने सुरेश काळे यांनी लोकमतचे प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल व तहसील प्रशासनाचे आभार मानले. या घटनेमुळे आजच्या काळातही प्रामाणिकपणा, सामाजिक भान आणि पत्रकारितेची मूल्ये जिवंत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. लोकमतचे शहर प्रतिनिधी हरिओमसिंह बघेल यांच्या प्रामानिक वागण्यामुळे नागरिकांमध्ये त्यांचे कौतुक होत आहे.




### प्रतिबंधित तंबाखू विक्री

यवतमाळ : डेली निड्सच्या दुकानातून प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची विक्री होत असल्याचा प्रकार वणी शहरात उघडकीस आला आहे. याची माहिती अन्न व औषधी प्रशासनाला मिळताच गुरुवारी १२ फेब्रुवारीला या दुकानाची झाडाझडती घेत दुकानदारावर गुन्हा दाखल करण्यात आला. वणीतील माउली डेली निड्स या दुकानात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला आणि आरोग्याला घातक असलेला सुगंधित तंबाखू विकला जातो, अशी माहिती अन्न व औषधी प्रशासनच्या यवतमाळ कार्यालयाला मिळाली होती. त्यावरुन १२ फेब्रुवारीला अन्न सुरक्षा अधिकारी अमितेशकुमार उपलप यांनी धडक देत या दुकानाची तपासणी केली. त्यावेळी या दुकानात सुगंधित तंबाखूची वेगवेगळी पाकिटे आढळून आली. हा मुद्देमाल जप्त करुन वणी पोलिसात उपलप यांनी तक्रार दाखल केली. त्यावरुन दुकानमालक वरुण अरुण शेलघरे (२१) तेलीफैल पीडब्ल्यूडी ऑफिसजवळ वणी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## कोलाम समाजाच्या विकासासाठी 'शामादादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' स्थापन करा

### शामा दादा कोलाम ब्रिगेडची मागणी

▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :-



अतिमागास कोलाम समाजाच्या आर्थिक.सामाजिक आणि शैक्षणिक समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शामा दादा कोलाम ब्रिगेडच्या प्रदेश अध्यक्षा सौ.इंदिरा बोंदरे आता आक्रमक झाल्या असून प्रकल्प कार्यालय पांढरकवडा ते पालकमंत्री संजय राठोड यांचे यवतमाळ येथील निवासस्थान असा पायदळ लाँग मार्च काढण्याचा निर्णय घेतला असून कोलाम समाजाच्या प्रलंबित प्रश्नांचा सखोल अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने तात्काळ 'शामादादा कोलाम स्वतंत्र अभ्यास आयोग' स्थापन करावा.अशी मागणी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षा सौ.इंदिरा बोंदरे यांनी केली आहे.याबाबत अधिक माहिती देताना सौ.इंदिरा बोंदरे म्हणाल्या की, "कोलाम समाज हा केंद्र सरकारने 'अतिमागास गट' (पी.व्ही.टी.जी) म्हणून घोषित केलेला समाज आहे.स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षांनंतरही हा समाज आजही शिक्षण. आरोग्य आणि रोजगाराच्या मूलभूत सोयींपासून वंचित आहे.केवळ कागदावर योजना राबवून समाजाचा विकास होणार नाही तर त्यासाठी जमिनीवर काय स्थिती आहे याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या नावाने स्वतंत्र अभ्यास आयोग स्थापन करून समाजाची सद्यस्थिती तपासणे.कोलाम पाड्यांवरील कुपोषण आणि सिकलसेल सारख्या आजारांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे.वनहक्क कायद्यांतर्गत प्रलंबित असलेले जमिनीचे पट्टे तात्काळ मंजूर करणे.सुशिक्षित कोलाम तरुणांसाठी विशेष आर्थिक पॅकेज आणि रोजगार हमी योजना राबवणे.या सर्व शामादादा कोलाम ब्रिगेडच्या मुख्य मागण्या आहेत. सौ.बोंदरे यांनी स्पष्ट केले की.जर शासनाने या मागण्यांकडे त्वरित लक्ष दिले नाही तर शामादादा कोलाम ब्रिगेड प्रकल्प कार्यालय ते पालकमंत्री संजय राठोड यांचे यवतमाळ येथील निवासस्थान पर्यंत कोलाम समाजाचा पायदळ लाँग मार्च सहित संपूर्ण राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल.या संदर्भात यापूर्वीच जिल्हाधिकारी आणि आदिवासी विकास मंत्र्यांना निवेदन सादर केले असून पुन्हा उपविभागीय अधिकारी कार्यालय केळापूर मार्फत पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन पाठविण्यात आले यावेळी ब्रिगेडचे जिल्हा पदाधिकारी आणि समाज बांधव उपस्थित होते,

## जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेत यश

▸विदर्भ केसरी। पुसद



जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या वतीने दिनांक 2 ते 4 फेब्रुवारी 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग मुला–मुलींच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये श्री देव निवासी मतिमंद विद्यालय पुसद या शाळेतील मतिमंद विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या नावलौकिकात भर घातली.

सांस्कृतिक स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या "हंगर (भूक)" या सामाजिक विषयावर आधारित नृत्य सादरीकरणाने विषयाची सखोल मांडणी, भावपूर्ण अभिव्यक्ती व कलात्मक सादरीकरणाच्या जोरावर सर्व परीक्षकांचे लक्ष वेधून घेत प्रथम क्रमांक पटकावला. सामाजिक जाणीव निर्माण करणारा हा प्रयोग स्पर्धेतील सर्वोत्तम ठरला. या यशाबद्दल मा. जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन करत, विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनी कला माध्यमातून सामाजिक विषय इतक्या प्रभावीपणे सादर करणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब असल्याचे नमूद केले.

याचबरोबर, सदर स्पर्धांमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रीडा विभागातही उल्लेखनीय कामगिरी करत पुढीलप्रमाणे यश संपादन केले. प्रणव राजेश उगले – स्पॉट जंप – प्रथम क्रमांक नैतिक मारोती कळंबे – सॉफ्ट बॉल थ्रो – द्वितीय क्रमांक पीयुष उद्दल राठोड – 100 मीटर धावणे – तृतीय क्रमांक शिवराज संतोष दांडेगावकर – गोळाफेक – तृतीय क्रमांक श्रेयस सिद्धार्थ कांबळे – स्पॉट जंप – तृतीय क्रमांक विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळा प्रशासन, शिक्षकवृंद व प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कारणीभूत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. सदर सांस्कृतिक व क्रीडा यशामुळे शाळेच्या कार्यास नवी दिशा मिळाली असून विशेष विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण क्षमतांविषयी समाजात सकारात्मक दृष्टिकोन अधिक दृढ झाल्याचे उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## अखेर कामाला सुरुवात

▸विदर्भ केसरी। पांढरकवडा



बोरगाव : गावातील मुख्य रस्त्यावर असलेल्या धोकादायक नालीमुळे शालेय विद्यार्थी आणि ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अपघाताला निमंत्रण देणारी ही नाली अनेक दिवसांपासून जीवघेण्या स्थितीत होती. अखेर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष अश्विन ठाकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर या नालीवर रपट्याचे काम सुरू करण्यात आले आहे. गावकऱ्यांकडून वारंवार तक्रारी येत असतानाही संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याची भावना व्यक्त होत होती. हा प्रश्न लक्षात येताच अश्विन ठाकरे यांनी बोरगाव ग्रामपंचायतीकडे सातत्याने पाठपुरावा केला. तसेच स्थानिक वृत्तपत्र विदर्भ केसरी मध्ये याबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामपंचायत प्रशासन खडबडून जागे झाले.

मुख्य रस्त्यावरील या नालीमुळे शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना दररोज जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत होते. पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत होती. संभाव्य अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने होत होती. अखेर ग्रामपंचायतीने दखल घेत रपट्याचे काम सुरू केले असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यापूर्वीही शाळेसंदर्भातील प्रलंबित प्रश्नांवर अश्विन ठाकरे यांनी पाठपुरावा करून प्रशासनाला जागे केले होते. या सामाजिक बांधिलकीच्या कार्याबद्दल गावातून त्यांचे अभिनंदन होत असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## खासगी रुग्णालयांची लूटमार थांबवा

### अन्यथा तीव्र आंदोलन : भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.)चा इशारा

▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते



पुसद : पुसद तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात काही खासगी दवाखाने व रुग्णालयांकडून सर्वसामान्य जनतेची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूटमार सुरू असल्याचा गंभीर आरोप भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांनी केला आहे. रुग्णांच्या नावाखाली अवाजवी रूम भाडे आकारणे, अनावश्यक तपासण्या लावणे, जादा बिलिंग करणे तसेच शासकीय आरोग्य योजनांचा गैरवापर करणे असे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः शासकीय योजनेंतर्गत रुग्ण भरती झाल्यानंतर, रुग्ण २–३ दिवसांत बरा झाला असतानाही त्याला मुद्दाम ७–८ दिवस रुग्णालयात ठेवून शासनाकडून जादा बिल उकळले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. हा प्रकार म्हणजे शासन आणि जनतेची सरळ फसवणूक असून गरीब, शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय कुटुंबांवर मोठा आर्थिक भार टाकणारा आहे.

या गंभीर प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांच्या वतीने शिष्टमंडळाने मा. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय पुसद तसेच मा. तालुका आरोग्य अधिकारी, पुसद यांना निवेदन सादर केले. संबंधित रुग्णालयांची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर विशेष नियंत्रण ठेवावे, अशी मागणी करण्यात आली. लवकरात लवकर ठोस कारवाई झाली नाही तर भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.) यांच्या वतीने जनतेच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.या वेळी भीम आर्मी जिल्हाध्यक्ष यवतमाळ अशोक भाऊ भालेराव, आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ राजकुमार भगत, तसेच आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हा महासचिव विशाल भाऊ डाके, प्रशिक कांबळे,अनिल कांबळे, आकाश चवरे,उपस्थित होते.

# यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दैनिक वसुली अखेर बंद

▸विदर्भ केसरी।यवतमाळ

### पिंटु बांगर यांनी केले होते हल्लाबोल आंदोलन



यवतमाळ नगर परिषद हद्दीत सुरू करण्यात आलेली दैनिक वसुली अखेर बंद करण्यात आली आहे. नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत हा निर्णय घेण्यात आला. या सक्तीच्या वसुलीमुळे व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. विशेष म्हणजे सर्वात पहिले शिवसेनेचे पिंटु बांगर यांनी व्यापा-यांना सोबत घेऊन वसुली विरोधात नगर परिषदेवर हल्लाबोल आंदोलन केले होते. कायम विरोध केल्यामुळे अखेर नवीन कार्यकारिणी येताच त्यांनी दैनिक वसुली बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे शहरातील व्यापा-यांनी स्वागत केले आहे.

शहरातील दैनिक वसुलीमुळे व्यापारी तसेच कंत्राटदारामध्ये संघर्षाची स्थिती निर्माण झाली होती. नगर परिषद हद्दीतील रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांकडून शुल्क वसूल करण्याचे कंत्राट देण्यात आल्यानंतर संबंधित कंत्राटदार केवळ रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांकडूनच नव्हे, तर दुकानांमधून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांकडूनही सक्तीने वसुली करीत होता.

दहा मीटरच्या आत असलेल्या दुकानाकरिता केवळ ३० रुपये आणि मोठ्या दुकानाकरिता ५० रुपये शुल्क निश्चित केले असतांना १०० ते २०० रुपयांपर्यंत सक्तीची वसुली केली जात होती. दुकानाबाहेर माल ठेवला तरी धमक्या देऊन वसुली करण्यात येत असल्याने संतापलेल्या व्यापा-यांनी पिंटु बांगर यांच्या नेतृत्वात नगर परिषदेवर हल्लाबोल आंदोलन केले होते. याशिवाय नगर परिषदेचे भाजपाचे गटनेते नितीन गीरी यांनी सुध्दा दैनिक वसुलीला विरोध केला. त्यामुळे नगर परिषदेने व्यापा-यांचा विरोध लक्षात घेऊन दैनिक वसुली बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे कर भरणा-या व्यावसाईकांकडून दैनिक वसुली करण्यात येऊ नये, कंत्राटदाराने मनात येईल तशी भरलेली रक्कम सक्तीने व्यावसाईकांकडून वसुल करण्यात येऊ नये, सर्वसमावेशक धोरण ठरविल्याशिवाय वसुली बाबत निर्णय घेऊ नये अशा सुचना पिंटु बांगर यांनी नगर परिषद सर्वसाधारण सभेत दिल्या.

### एकनाथ शिंदे आणि भावनाताईंचे अभिनंदन

■ **मालमत्ता करावरील व्याज माफ करण्यासाठी माजी खासदार भावनाताई गवळी यांनी सरकारकडे पाठपुरावा केला होता. या मागणीच्या अनुषंगाने एकनाथ शिंदे यांनी संपुर्ण राज्यातील नगर परिषद हद्दीमधील मालमत्ता करावरील व्याज माफ करण्यासाठी अभय योजना लागु केली होती. याबाबत पिंटु बांगर यांनी अभिनंदन करण्याबाबत सभागृहाला विनंती केल्यानंतर सर्वांनी टाळ्या वाजवून या दोन्ही नेत्यांचे अभिनंदन केले.**

## पारधी वस्तीवर हल्ला; ३ महिला जखमी

**▸विदर्भ केसरी।**

टाकरवण : गेवराई तालुक्यातील सुर्डी बुद्रुक शिवारात मेढ्या चरण्यास विरोध केल्याने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शेतात मेढ्या चरण्यास न दिल्याने रागातून ३० ते ४० जणांच्या जमावाने पारधी वस्तीवर सशस्त्र हल्ला चढवला. या हल्ल्यात तीन महिला गंभीर जखमी झाल्या असून वस्तीवरील मालमत्तेचे मोठे नुकसान करण्यात आले आहे. या हल्ल्यात पायल डिस्टीमन काळे, शेवंता डिस्टीमन काळे आणि राघबाई मेघवर काळे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## महत्त्वाचे

### मूर्तिजापूरात हॉटेल समोरून दुचाकी लंपास.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**

शहरातील स्टेशन विभाग परिसरात असलेल्या 'मोहन भोजनालय' समोरून एक जुनी वापरती दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मुर्तिजापुर शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी गजानन रामअवतार शर्मा (वय ६३ वर्ष), रा. स्टेशन विभाग, मुर्तिजापुर हे 'मोहन भोजनालय' चालवतात. त्यांनी आपली काळ्या रंगाची हिरो स्पलेंडर मोटारसायकल (क्रमांक MH 30 AG 5645) नेहमीप्रमाणे भोजनालयासमोर उभी केली होती. दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ च्या रात्री १०:३० ते १३ फेब्रुवारी २०२६ च्या सकाळी ६:०० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने संधी साधून ही दुचाकी चोरून नेली. सकाळी फिर्यादी जेव्हा मॉर्निंग वॉकला जाण्यासाठी बाहेर आले, तेव्हा त्यांना आपली दुचाकी जागेवर दिसली नाही. परिसरात शोध घेऊनही गाडी मिळून न आल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. वाहन: हिरो स्पलेंडर (काळा रंग) क्रमांक: MH 30 AG 5645 चेसीस नं: MBLHALOASCHF41291 इंजिन नं: HALO ELCHF46993 अंदाजित किंमत: ४०,००० रुपये. फिर्यादीच्या तक्रारीवरून मुर्तिजापुर शहर पोलिसांनी कलम ३०३ (२) BNS २०२३ अन्वये गुन्हा (अप. नं. २६६/२०२६) दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार योगेश लोनकर (ब.नं. २७२) करीत आहेत. गुन्ह्याची नोंद WASI उज्वला भाले यांनी केली आहे.

### भरधाव दुचाकीच्या धडकेत युवक जखमी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

भरधाव दुचाकीने धडक दिल्यामुळे एक युवक जखमी झाला. हा अपघात पुसद तालुक्यातील हिवळणी पालमपट येथे ८ फेब्रुवारी रोजी घडला. मुसैब फारकलीत अतमतउल्लाह बेग (२९) रा. वसंतनगर पुसद असे या अपघातात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. तो शेंबाळपिंपरीहून पुसदकडे जात असताना त्याला एमएच २९ सीवाय ५३६५ क्रमांकाच्या दुचाकीने धडक दिली. या प्रकरणी मुसैब फारकलीत अतमतउल्लाह बेग यानी दाखल केलेल्या फिर्यादीवरुन खंडाळा पोलिसांनी १३ फेब्रुवारीला दुचाकीचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

### फुलसावंगीत दोन दुचाकींची धडक

यवतमाळ : महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे दोन दुचाकींची धडक झाली. यात एका दुचाकीवरील कर्मचाऱ्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. उमरखेड तालुक्यातील श्रीनगर येथील देवीदास मारोती वाघमारे (५७) हे आपल्या नोकरीनिमित्त महागाव तालुक्यातील फुलसावंगीकडे जात होते. त्यांच्या एमएच २९ डब्ल्यूएस १०६१ क्रमांकाच्या दुचाकीला समोरुन येणाऱ्या एमएच ०२ एफओ ४६९९ क्रमांकाच्या दुचाकीने जबर धडक दिली. १२ फेब्रुवारीला घडलेल्या या अपघातात देवीदास वाघमारे हे गंभीर जखमी झाले. त्यांनी या प्रकरणी महागाव पोलिसात फिर्याद नोंदविली असून पोलिसांनी एमएच ०२ एफओ ४६९९ क्रमांकाच्या दुचाकी चालकावर गुन्हा दाखल केला आहे.

### आठवीत शिकणाऱ्या दोन वर्गमित्रांनी दोन दिवसांच्या अंतराने संपवले जीवन

**▸विदर्भ केसरी। बुलडाणा:**

बुलडाणा शहरातील एका नामांकित विद्यालयात आठव्या वर्गात शिकणा-या दोन वर्ग मित्रांनी राहत्या घरात छताला गळफास घेऊन अकालीच आपली जीवनयात्रा संपवली आहे. या घटनांनी पालकवर्गाला प्रचंड धक्का बसला आहे.अवघ्या चौदा वर्षे वयाच्या दोन विद्यार्थ्यांनी लागोपाठ दोन दिवसांच्या अंतराने असे टोकाचे पाऊल उचलल्याने शैक्षणिक क्षेत्रही चिंतित झाले आहे. शहरातील भारत विद्यालयात आठव्या वर्गात शिकणा-या नमन अरुण राऊत या विद्यार्थ्याने शिक्षक व शिक्षिका असलेले त्याचे आईवडील हे कर्तव्यावर बाहेरगावी गेले असतांना बुधवार दि.११च्या सकाळी १० वाजता छत्रपती नगरातील आपल्या राहत्या घरी अभ्यास कक्षाच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. त्या दुःखद घटनेच्या पाठोपाठ आज शनिवार दि.१४च्या सायंकाळी ५ वाजता मृत नमन राऊत या विद्यार्थ्याचा वर्गमित्र अथर्व वैभव राणे याने शाळेतून परतल्यानंतर सुंदरखेड परिसरातील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.वैभवचे वडील कारागृह पोलीस आहेत. बुलडाण्यातील अल्पवयीन वर्गमित्र विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांनी पालकवर्गाला प्रचंड धक्का बसला आहे. या अनाकलनीय घटनांमागील कारण शोधणे हे पोलिसांसमोर आव्हान आहे.

### कंटेनरची दुचाकीस जोराची धडकः पत्नी जागीच ठार तर पती गंभीर

**▸विदर्भ केसरी। नागाव :**

पुणे-बेंगळूर राष्ट्रीय महामार्गावर टोप (ता. हातकणंगले) येथील महाडिक वसाहतीसमोर शनिवारी सायंकाळी सहाच्या सुमारास एक हृदयद्रावक अपघात घडला. भरधाव आयशर टेम्पोने मोटरसायकलला दिलेल्या धडकेत श्वेता अक्षय चव्हाण (वय २५, रा. रेठरे बुद्रुक, जि. सांगली) या महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिचे पती अक्षय चव्हाण (वय २७) हे गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर महामार्गावरील वाहतूकीची काही काळ कोंडी झाली होती याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी की सातारा जिल्ह्यातील रेठरे बुद्रुक येथील अक्षय आणि श्वेता हे दाम्पत्य कोल्हापूरमधील एका खाजगी कंपनीत नोकरीस होते. शनिवारी सुट्टी असल्याने दोघेही आपल्या मोटरसायकलवरून (क्र. MH 10 CP 0856) गावी निघाले होते. सायंकाळी सहाच्या सुमारास ते टोप येथील महाडिक वसाहतीजवळ आले असता, पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव आयशर टेम्पोने (क्र. MH 14 - 9144) त्यांच्या मोटरसायकलला पाठीमागून जोरदार धडक दिली.ही धडक इतकी भीषण होती की, श्वेता चव्हाण या टेम्पोच्या चाकाखाली आल्या आणि त्यांच्या शरीर अक्षरशः छिन्नविच्छिन्न होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. अक्षय चव्हाण हे देखील रस्त्यावर फेकले गेल्याने गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना उपचारासाठी कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर चालक टेम्पोसह पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, परिसरातील सजग नागरिकांनी तातडीने पाठलाग करून संभापूर जवळ टेम्पो अडवला. अपघातामुळे महामार्गावर दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. शिरोली एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. टोप जवळील पेठवडगावला जाणाऱ्या सेवा रस्ता रस्त्याच्या कामामुळे अनेक महिन्यांपासून बंद आहे. यामुळे मुख्य महामार्गावर वाहतुकीचा ताण वाढून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. "प्रशासनाने दोन्ही बाजूचे सेवा रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा , अन्यथा अजून किती निष्पाप जीव जाणार?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या अपघाताची नोंद रात्री उशिरा शिरोली एमआयडीसी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पोलीस करत आहेत.

# महाशिवरात्रीला महामुकाबला

**▸विदर्भ केसरी।**




भारत-पाकिस्तान सामना होणार की नाही, या अनिश्चिततेतून बाहेर पडल्यावर भारत-पाकिस्तान पेक्षा कोलंबोत उत्साहाचे वारे संचारले आहे. एका सामन्याने त्यांच्या अर्थव्यवस्थेला भरपूर हातभार लागणार असल्याने पर्यटनाशी निगडित सर्वच म्हणजे विमान कंपन्या, हॉटेल्स ते अगदी टॅक्सीवाले आपली दिवाळी साजरी करून घेत आहेत. भारतीय संघ स्पर्धेतील आपला दुसरा विजय मिळवून शुक्रवारी रात्री कोलंबोत दाखल झाला, तेव्हा त्यांच्या स्वागताला मोठ्या गर्दीबरोबरच आकाशात पावसाचे ढगही आले. आज या महामुकाबल्यात पावसाच्या व्यत्ययाचा अंदाज व्यक्त केला आहे. सकाळी आणि दुपारी पावसाच्या सरींची शक्यता असली तरी संध्याकाळी उघडीप होऊन एखाद दुसरी सर येऊन सामन्यात व्यत्यय आणू शकते. एक चांगले आहे ते म्हणजे या प्रेमदासा स्टेडियमला निव्वळ खेळपट्टी आणि बाजूचा परिसर नाही तर संपूर्ण मैदान कव्हरने झाकायची सुविधा आहे. निसर्गाचे चक्र आपल्या हातात नाही तेव्हा सामन्याच्या दृष्टीने दोन्ही संघांची तयारी बघणे महत्त्वाचे ठरते.

या महत्त्वाच्या सामन्याला नवी खेळपट्टी नसून ऑस्ट्रेलिया झिम्बाब्वे सामन्याला वापरलेलीच खेळपट्टी वापरली जाणार आहे. प्रेमदासाची खेळपट्टी ही संथ आहे आणि त्यातून ही वापरलेली खेळपट्टी आहे. जरी ऑस्ट्रेलिया-झिम्बाब्वे सामन्यात पडलेल्या 12 बळींपैकी 10 हे जलदगती गोलंदाजांनी मिळवले असले तरी आजच्या सामन्याला ही खेळपट्टी फिरकीला मदत करेल, असा अंदाज आहे. अर्थात, सकाळपासून पाऊस झाला आणि झाकलेल्या खेळपट्टीत जर हवेतील दमटपणा उतरला तर चित्र बदलू शकते. या पार्श्वभूमीवर भारतीय गोलंदाजीची प्रमुख धुरा बुमराह, हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांच्यावर असेल. बुमराहला नामिबियाविरुद्ध नवा चेंडू मिळाला नाही तरी या सामन्यात तो गोलंदाजीची सुरुवात करेल. भारताचे दुसरे अस्त्र वरुण चक्रवर्ती असेल. त्याने या सामन्यासाठी एक खास चेंडू तयार केला आहे, हे त्याने आधीच जाहीर करून पाकिस्तानच्या गोटात अस्वस्थता निर्माण केली आहे. अर्शदीप का कुलदीप यादव यात माझी पसंती कुलदीप यादवला असेल. या संथ खेळपट्टीवर कुलदीप गोलंदाजीतील विविधतेने पाकिस्तानला अडचणीत आणेल. भारतीय उपखंडातील खेळपट्ट्यांवरचे 3 फिरकी गोलंदाजांचा नेहमीचा यशस्वी फॉर्म्युला आपण आज वापरला पाहिजे. थोडक्यात जे धोरण आपण 2025 च्या आशिया चषकात दुबईला खेळताना वापरले तेच इथेही यशस्वी ठरेल. या पाच प्रमुख गोलंदाजांना गरज पडल्यास हातभार लावायला शिवम दुबे असेलच.

भारतीय संघाच्या फलंदाजी क्रमात विशेष बदल संभवत नाही. अभिषेक शर्मा का संजू सॅमसन याचे उत्तर आजच मिळेल. अभिषेक शर्मा तंदुरुस्त होऊन जर खेळला तर त्याच्याकडून शाहिन शाह आफ्रिदीची लय बिघडवायचे मुख्य काम असेल. संजू सॅमसन याही सामन्यात खेळणार असेल तर त्याला आपल्या तंत्रात सुधारणा करावी लागेल. सुनील गावसकरांनी त्याच्या बाद होण्याचे अचूक विश्लेषण करताना म्हटले आहे की, संजू त्याचा हवेतील फ्लिक खेळताना क्रीजमध्ये खूप मागे जाऊन खेळतो. यामुळे त्याला हवी ती उंची मिळत नाही आणि डीप स्क्वेअर लेग आणि डीप मिडविकेट यांच्या मधून गेला तरच तो झेल जात नाही. जर नामिबिया अभ्यास करून सॅमसनसाठी क्षेत्ररक्षण लावू शकते तर पाकिस्तानने नक्कीच याचा अभ्यास केला असेल. भारताचे पहिले दोन सामने बघितले तर मधल्या फळीची कामगिरी या सामन्यात उंचावणे गरजेचे आहे. विशेषतः शिवम दुबे, रिंकू सिंग आणि अक्षर पटेल यांच्याकडून उत्तम कामगिरीची अपेक्षा आहे. मोठ्या स्पर्धेत खेळायचे दडपण झुगारून रिंकूने त्याच्या नैसर्गिक फटकेबाजीने दहा-बारा चेंडू जरी खेळला तरी संघासाठी उपयुक्त 25 - 30 धावा वाढू शकतात. पाकिस्तान संघ गेले दोन आठवडे आपण खेळायचे का नाही या संदिग्ध अवस्थेत होता. जेव्हा त्यांच्या बोर्डाने यू टर्न घेतला तेव्हा जरी ते अधिकृतपणे या सामन्याच्या तयारीला लागले असले तरी कर्णधार सलमान आगाने आम्ही आधीपासूनच तयार होतो, हे पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

एका दृष्टीने पाकिस्तानी संघालाही आपले बोर्ड आणि सरकार माघार घेणार हे माहीत असल्याची कबुलीच त्याने दिली. पाकिस्तान पहिल्या नेदरलँड विरुद्धच्या सामन्यात थोडक्यात बचावानतर यूएसए विरुद्ध सहज जिंकून या सामन्याला सामोरे जात आहेत. पाकिस्तान त्यांचे सर्व सामने कोलंबोतच खेळले असले तरी भारत आणि कोलंबो हे अंतर, वातावरण आणि खेळपट्ट्या बघता या कोलंबोच्या परिचित वातावरणाचा त्यांना भारतापेक्षा अधिक फायदा आहे, असे मुळीच नाही.

## जिल्हा परिषद शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**▸विदर्भ केसरी। कमळखेड (दि. 13 फेब्रुवारी 2026)**



– जिल्हा परिषद शाळा कमळखेड येथे वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम गावकऱ्यांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात व आनंदात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सुवर्णाताई चंद्रशेखर लांडे होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच श्रीधर अनिल कांबे, श्री चंद्रशेखर लांडे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री विक्रांत दादा कांबे, श्री गोपाल काबे, श्री राजूभाऊ बांबल, जनार्दन आप्पा बांबल, श्री अरुण वसु काका, ग्रामपंचायत सदस्य शितलताई रवी कांबे आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ. सुषमा सागर ब्राह्मणे उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाट्य व सांस्कृतिक कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान प्रत्येक वर्गातील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना मेडल व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच 'बेस्ट स्टुडंट अवॉर्ड' कु. प्राप्ती विकास भगत हिला प्रदान करण्यात आला. सरपंच सुवर्णाताई लांडे यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना एक्झाम पॅडचे वाटप करण्यात आले. तसेच गावकऱ्यांकडून विद्यार्थ्यांसाठी विविध बक्षिसे देण्यात आली. गावातील ज्येष्ठ नागरिक श्री अरुण वसु यांनी शाळेबद्दल समाधान व्यक्त करत जिल्हा परिषद शाळेबद्दलची आत्मीयता व्यक्त केली. तसेच श्री अमर दादा बडवे यांनी आपल्या मनोगतात जिल्हा परिषद शाळा कॉन्व्हेंटपेक्षा चांगली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पूजा बांबल, सानू कांबे, युवराज, अजय कांबे आणि रवी सरपे यांचे सहकार्य लाभले. तसेच उपस्थितांसाठी सौ. सारिका ताई विक्रांत कांबे व त्यांच्या महिला मंडळाने उत्कृष्ट फराळाची व्यवस्था केली. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. सदर कार्यक्रम आदरणीय केंद्रप्रमुख लताताई सोळंके, केन्द्र कानडी यांच्या मार्गदर्शनात आयोजित केला असून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पूनम अशोकराव बाहाकर (येवले) यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. अपर्णा शिवाजीराव साबळे (मोहोड) यांनी केले. कार्यक्रम अतिशय यशस्वी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्याबद्दल गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## अमरावती जिल्हा डीएमएलटी असोसिएशनची कॉन्फरन्स संपन्न

**▸विदर्भ केसरी। अमरावती**



अमरावती जिल्हा असोसिएशन नियमित दरवर्षी कॉन्फरन्स आयोजित करीत असते.

संपुर्ण महाराष्ट्रा मधून अमरावती एकमेव जिल्हा आहे जिथे कॉन्फरन्स ही दरवर्षी घेतली जाते, दि 8 फेब्रुवारी 2026 ला अमरावती जिल्हा असोसिएशन ने आयोजित केलेल्या कॉन्फरन्सला अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद निरवने यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाला सांगली वरून ए एच पी सदस्य डॉ गिरीशकुमार मंगल शिवलिंग शरणाथे , डॉ अक्षय खराते अरुण विंचूरकर उपस्थित होते. त्याच सोबत डॉ सौम्या संगई ओंकॉलॉजिस्ट व इतर सर्व मान्यवर या या कॉन्फरन्सला उपस्थित होते. संघटनेचे सचिव योगेश घाटे यांनी केले या वेळी त्यांनी संघटना काय करत आहे व पुढे संघटनेचे काय उद्दिष्ट आहे या बद्दल महिती दिली , डॉ. प्रमोद निरवने यांनी आपल्या मनोगतात टेक्नॉलॉजिस्ट चे महत्त्व आपल्या शब्दात पटवून सांगितले. टेक्नॉलॉजिस्ट एक आरोग्य क्षेत्रातील महत्त्वाचा भाग असून त्यांना दुर्लक्षित ठेवून काम करता येत नाही अशा शब्दात त्यांनी टेक्नॉलॉजी चे महत्व सर्वांना पटवून दिले. अमरावती जिल्हा असोसिएशन चे अध्यक्ष डॉ एन व्ही रडके यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून संघटनेच्या कामा बद्दल सविस्तर माहिती दिली या नंतर डॉ. सौम्या संगई यांचे हिस्टोपॅथॉलॉजी या विषयावर अतिशय उत्कृष्ट लेक्चर संपन्न झाले. नंतर ए एच पी सदस्य डॉ शरणाथे यांनी सविस्तर माहिती दिली व सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तरे दिली , नागपूर ची मंडळी या कॉन्फरन्स ला उपस्थित राहिली त्यावेळी संदीप झाडे यांनी संघटनेचे कार्य काय असते संघटन का गरजेचे आहे याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी अमरावती जिल्यातील संपूर्ण टेक्नॉलॉजिस्ट बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## शिमग्याआधीच एसटी कर्मचाऱ्यांवर आली, बोंब मारण्याची वेळ



**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

एसटी महामंडळाच्या राज्यभरातील कर्मचाऱ्यांना वेतनासोबत या महिन्यात वेतनवाढ फरक हप्ता न मिळाल्याने असंतोष पसरला असून राज्य सरकारच्या अर्थ खात्यातील कामगार विरोधी अधिकाऱ्यांमुळे शिमग्या अगोदरच बोंब मारण्याची वेळ कर्मचाऱ्यावर आली. येत्या 24 तारखेला अनोख्या पद्धतीने होणाऱ्या आंदोलनाच्या टीझरचे सादरीकरण कानठळ्या बसतील इतक्या बोंबा मारून एसटी कामगारांनी शनिवारी सरकारला इशारा दिला

महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसच्या वतीने सरचिटणीस श्रीरंग बरगे यांच्या उपस्थितीत एसटी कर्मचाऱ्यांनी दादर येथील टिळक भवन येथे बोंब मारो आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर टीझरचे सादरीकरण केले. टीझरच्या माध्यमातून प्रत्यक्ष बोंबा मारून अनोख्या पद्धतीने राज्य सरकारच्या अर्थ खात्यातील कामगार विरोधी अधिकाऱ्यांना हा इशारा देण्यात आला.या संदर्भातील आंदोलनाची नोटीस परिवहन खात्याचे अप्पर मुख्य सचिव यांच्या मार्फत राज्य सरकारच्या अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांना देण्यात आली असून 24 फेब्रुवारी रोजी, आझाद मैदान, मुंबई येथे हे आगळे-वेगळे बोंब मारो आंदोलन करण्यात येणार आहे.

## महाशिवरात्री निमित्त स्वच्छ मंदिर संस्कारी समाज संकल्पनेतून अटल फाउंडेशनने राबविले स्वच्छता अभियान

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



अटल फाउंडेशन महाराष्ट्र यांचे वतीने पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचे स्वच्छता ही सेवा या संकल्पनेवर आधारित मंदिर स्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रीय अध्यक्ष अपर्णा सिंह त्रिपाठी प्रदेश अध्यक्ष गणेश राजे यांचे मार्गदर्शनाखाली प्रदेश महामंत्री विष्णू लोडम यांचे पुढाकाराने जिल्हाध्यक्ष रूपाली तिडके यांचे नेतृत्वात जुनी वस्ती येथील प्राचीन श्री नागोडेश्वर महादेव मंदिर येथे अटल फाउंडेशन अकोला जिल्हा शाखा मूर्तिजापूरच्या वतीने महाशिवरात्रीचे पावन औचित्य साधून मंदिर स्वच्छता अभियान राबवीण्यात आले अटल फाउंडेशन च्या वतीने वर्षभर चालणाऱ्या सातत्यपूर्ण सामाजिक उपक्रमाबद्दल माननीय आमदार हरीशभाऊ पिंपळे तसेच नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी कौतुक केले व शुभेच्छा दिल्या मंदिर हे केवळ पूजेचे ठिकाण नसून साधना आणि आस्थेचे अधिष्ठान आहे या पवित्र ठिकाणी संस्कार मिळतात यामुळेच संस्कारशील नागरिक व संस्कारीत समाज घडतो म्हणूनच स्वच्छ मंदिर आणि अटल विचार पुढे नेऊया असे मत अटल फाउंडेशनचे प्रदेश महामंत्री विष्णू लोडम यांनी व्यक्त केले. स्वच्छता अभियानामध्ये विशेष सहकार्य करणाऱ्या माऊली भजन मंडळाच्या सदस्यांचे विशेष आभार जिल्हाध्यक्ष रूपालीताई तिडके यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले कार्यक्रमाला प्रामुख्याने राज्य परिषद सदस्य भाजपा श्री राजकुमार नाचणे भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक राम जोशी नगरसेवक गजानन नाकट रामाभाऊ हजारे कैलास महाजन समाजसेवक दिवाकर सोनाने विलास वानखडे रमेश दर्यानि किशोर टाक कैलास गचके आशु भेले यांनी सुद्धा स्वच्छता अभियानामध्ये सहभाग नोंदविला मंदिराचे सभागृह, गर्भगृह व परिसरात व्यापक स्वच्छता करण्यात आली व अटल फाउंडेशन च्या वतीने मंदिर परिसर स्वच्छ राहावा या हेतूने कचरा पेट्या भेट देण्यात आल्या यामुळे भाविकांमध्ये समाधान पाहायला मिळाले असे कार्यक्रम नित्य व्हावे असे नागरिकांनी आपले मत व्यक्त केले


कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अटल फाउंडेशन जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. स्वाती पोटे उपाध्यक्ष निकिता शर्मा तालुका अध्यक्ष कविता साखरे निरंजन सोळंके युवती तालुकाध्यक्ष शिवकन्या कु.शिवानी श्रीराव शहराध्यक्ष माया दवंडे, दिनेश श्रीवास उपाध्यक्ष श्याम काकडे शहर सचिव सोनल बांगड रूपाली गुल्हाने वनस्कार ताई इत्यादी अटल फाउंडेशन चे पदाधिकारी व माऊली भजन मंडळ च्या बेबीताई पिंपळकर वच्छला वानखडे लता इंगोले बेबी धामोरे पुष्पा इंगळे लता श्रीनाथ सुनिता गचके आशा गवळे संतोष गिरी यांनी परिश्रम घेतले

# पश्चिम विदर्भाची काशी 'लाखपूरी' सजली.

## महाशिवरात्री उत्सवाची जय्यत तयारी!

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**





मूर्तिजापूर व दर्यापूर तालुक्याच्या सीमेवर, पूर्णा नदीच्या विलोभनीय तीरावर वसलेले पश्चिम विदर्भातील शिवभक्तांचे श्रद्धास्थान म्हणजेच भगवान श्री लक्षेश्वर संस्थान, लाखपुरी. यावर्षी देखील महाशिवरात्री महोत्सवा निमित्त संस्थानच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली असून, लाखो भाविकांच्या स्वागतासाठी मंदिर परिसर सज्ज झाला आहे. भक्तांच्या सुविधेसाठी विशेष नियोजन रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्रीच्या मुख्य पर्वावर भाविकांना शिस्तबद्ध दर्शन घेता यावे, यासाठी विशेष दर्शनबारी क्यू लाईन तयार करण्यात आली आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी आणि उपवासाच्या फराळाची चोख व्यवस्था संस्थानतर्फे करण्यात आली आहे. असाअसेलतीनदिवसीयभरगच्चकार्यक्रम या महोत्सवामध्ये धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांची सांगड घालण्यात आली आहे:

१५ फेब्रुवारी रविवार पहाटेपासून सार्वजनिक अभिषेक, काकडा आरती आणि भावगीतांचा कार्यक्रम होईल. विशेष म्हणजे, याच दिवशी गावातील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, नवनियुक्त व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव केला जाणार आहे. संध्याकाळी हरिपाठ व रात्री कीर्तनाचा जागर होईल.

१६ फेब्रुवारी सोमवार सकाळी काल्याचे कीर्तन पार पडेल. दुपारी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री भगवान श्री लक्षेश्वरांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येईल.

१७ फेब्रुवारी मंगळवार सकाळी ९ वाजता पूर्णा नदीच्या पात्रात दहीहंडी फोडून या त्रिदिवसीय महाशिवरात्री महोत्सवाची सांगता होईल. उत्सवा दरम्यान होणारी गर्दी लक्षात घेता, मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये.

श्री लक्षेश्वर संस्थानच्या वतीने सर्व शिवभक्तांना या सोहळ्याला उपस्थित राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## आरोग्य सुविधांचा बोजवारा; आरमोरी–कुरखेड्यासाठी ब्लड बँकची जोरदार मागणी



गडचिरोली : जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधत आमदार रामदास मसराम यांनी आरमोरी किंवा कुरखेडा येथे तातडीने स्वतंत्र ब्लड बँक स्थापन करण्याची मागणी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे केली आहे. जिल्ह्यातील रुग्णांना आपत्कालीन परिस्थितीत रक्त उपलब्ध होण्यात मोठ्या अडचणी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. अपघात, प्रसूती व गंभीर आजारांच्या वेळी रुग्णांना चंद्रपूर किंवा गडचिरोली येथे हलवावे लागते, त्यामुळे उपचारास विलंब होऊन जीवितहानीचा धोका निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार मसराम यांनी तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका व तंत्रज्ञांची अनेक पदे रिक्त असल्याचा मुद्दाही उपस्थित केला. रिक्त पदांमुळे आरोग्य सेवा कोलमडल्याची स्थिती निर्माण झाली असून, तातडीने भरती प्रक्रिया राबवावी अशी मागणी त्यांनी केली. तसेच आपत्कालीन सेवेसाठी उपलब्ध असलेल्या रुग्णवाहिका वेळेवर पोहोचत नसल्याची गंभीर समस्या त्यांनी मांडली.

## संक्षिप्त




### मौशिखांब ग्रामपंचायतीत 'मुख्यमंत्री पंचायत राज अभियान' अंतर्गत अभ्यासिका सुरू

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व शांत अभ्यासाचे वातावरण मिळावे या उद्देशाने मौशिखांब ग्रामपंचायतीने 'मुख्यमंत्री पंचायत राज अभियान' अंतर्गत सुसज्ज अभ्यासिका सुरू करून शिक्षण क्षेत्रात एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. गावातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे युवक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आता गावातच अभ्यासासाठी स्वतंत्र, सुरक्षित व शिस्तबद्ध जागा उपलब्ध झाली आहे. या अभ्यासिकेमध्ये बसण्याची सोय, प्रकाशव्यवस्था, पंखे तसेच आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना घरगुती अडचणींमुळे अभ्यासासाठी योग्य वातावरण मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने पुढाकार घेत हा उपक्रम राबविला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अभ्यासिकेच्या शुभारंभप्रसंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. रंजिता पेंदाम यांनी विद्यार्थ्यांना नियमितपणे अभ्यासिकेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. उपसरपंच सौ. रुपाली गांधरवार यांनी हा उपक्रम गावाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. ग्रामविकास अधिकारी श्री. खुशाल नेवारे यांनी शासनाच्या विविध योजनांचा योग्य वापर करून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य विकास उंदीरवाडे, जयकुमार खेडेकर, सुधाकर गेडाम उपस्थित होते. ग्रामपंचायत मौशिखांबचे तंटामुक्ती अध्यक्ष गणेश दहलकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत सातत्य, शिस्त आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित केले.

गावातील नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे स्वागत केले असून भविष्यातही अशा शैक्षणिक व विकासाभिमुख योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मौशिखांब ग्रामपंचायतीचा हा उपक्रम ग्रामीण शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### वादातील बांधकाम पाडल्याने न्यायालय अवमानाचा आरोप ; अजय कंकडालवार यांच्या पत्रकार परिषदेतून व्यक्त..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्ह्यातील अहेरी परिसरात वादग्रस्त बांधकाम पाडण्याच्या



कारवाईवरून नवीन वाद निर्माण झाला आहे. संबंधित बांधकाम मालकाच्या म्हणण्यानुसार, दिनांक 12 फेब्रुवारी 2026 रोजी कोणतीही पूर्वसूचना, आदेश किंवा नोटीस न देता त्यांचे बांधकाम पाडण्यात आले. या कारवाईमुळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. सदर प्रकरणाबाबत यापूर्वीच मुंबई हाय कोर्ट नागपूर बेंच येथे सुनावणी झाली होती. न्यायालयाने दिनांक 6 फेब्रुवारी 2026 रोजी जैसे थे (status quo) ठेवण्याचे आदेश दिले होते, अशी माहिती समोर आली आहे. मात्र, हे आदेश अस्तित्वात असतानाही बांधकामावर कारवाई केल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांनी संबंधित कारवाई ही न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन असल्याचे सांगत न्यायालयाचा अवमान झाल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणीही अजय कंकडालवार यांच्याकडून पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाकडून याबाबत अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. त्यामुळे या प्रकरणाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.




### "माझं गाव,वआरोग्यसंपन्न गाव" या योजनेस मंत्रीमंडळाची मान्यता

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" या अभियानास राज्य सरकारने मंजूरी दिली आहे. लोकसहभागावर आधारित "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. १ एप्रिलपासून ३१ मार्चपर्यंत राज्यभर हे अभियान राबविण्यात येणार आहे. गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्सनात्मक आरोग्य सेवाना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल, व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हा या अभियानाचा मुख्य उद्दीष्ट आहे. या अभियाना अंतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता - बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन,जीवनशैलीजन्य आजारांचे नियंत्रण आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. "माझं गाव आरोग्यसंपन्न गाव" या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असुन, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना "आरोग्यसंपन्न गाव" म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. अभियानासाठी सुमारे 80.75 कोटी रुपये निधी मंजूर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. माझं गाव आरोग्यसंपन्न गाव ही योजना म्हणजे केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रताप शिंदे यांनी सांगितले.

# चंद्रपूर महाऔद्योगिक वीज केंद्रात चौकशीसाठी उपोषणाचा इशारा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : कुणाल गायकवाड**

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'काका-पुतण्या' वादाची चर्चा रंगत असताना, आता चंद्रपूर महाऔद्योगिक विद्युत केंद्रात (CSTPS) प्रशासकीय स्तरावर 'काका-पुतण्या'च्या संगनमताने भ्रष्ट कारभार सुरू असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

मुख्य अभियंता यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून आपल्या नातेवाईकाला झुकते माप दिल्याचा आरोप करत, सुनील देहेगावकर यांनी येत्या ८-१० दिवसांत कारवाई न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.



### नेमके प्रकरण काय?

- सुनील देहेगावकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, चंद्रपूर महाऔद्योगिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता विजय राठोड यांनी आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना कामे मिळवून देण्यासाठी आणि प्रशासकीय यंत्रणेवर पकड ठेवण्यासाठी आपला पुतण्या श्री. विकी राठोड याची 'टेक्निकल असिस्टंट' म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती नियमांना बगल देऊन करण्यात आल्याची तक्रार सुनील दहिगावकर यांनी केली आहे

### निवेदनातील मुख्य मागण्या

- विकी राठोड यांच्या नियुक्तीची चौकशी: टेक्निकल असिस्टंट म्हणून करण्यात आलेली ही नियुक्ती कोणत्या निकषांवर झाली, याची सखोल चौकशी व्हावी. कामांचे ऑडिट: विजय राठोड यांच्या कार्यकाळात झालेली आणि सध्या सुरू असलेली सर्व कामे, कंत्राट आणि त्यातील आर्थिक व्यवहारांची चौकशी करावी.

### भ्रष्टाचाराला पाठीशी घालणे थांबवा

- निवेदने देऊनही अद्याप कोणतीही चौकशी न झाल्याने, प्रशासन या भ्रष्टाचाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप देहेगावकर यांनी केला आहे. "मुख्य अभियंत्यांच्या मनमानी कारभारामुळे महा औद्योगिक केंद्राचे नुकसान होत आहे. जर ८ ते १० दिवसांत त्यांच्यावर कारवाई झाली नाही, तर मला साखळी उपोषण आणि त्यानंतर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल. या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल."
**- सुनील देहेगावकर**

### प्रशासकीय हालचालींकडे लक्ष

- या संदर्भात देहेगावकर यांनी कार्यकारी संचालक नितीन वाघ, कार्यकारी संचालक राजेश पाटील, व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, संचालक महावितरण संजय मारुडकर यांना निवेदन सादर केले आहे. आता वीज केंद्र प्रशासन या गंभीर आरोपांची दखल घेऊन चौकशीचे आदेश देते की देहेगावकर यांना आंदोलनाचे हत्यार उपसावे लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शासनाच्या कामगारविरोधी धोरणाबद्दल आंदोलन

## 4000 कामगारांची उपस्थिती, गडचिरोली जिल्हाधिका-यासमोर केला निषेध

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : केंद्र सरकारच्या कामगार विरोधी चार श्रमसंहिताच्या विरोधात आज देशभर एक दिवसीय देशव्यापी सार्वत्रिक संपाची हाक दिली होती. गडचिरोली जिल्ह्यातील हजारो अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर, शालेय पोषण आहार कर्मचारी, अंशकालीन परीचर कर्मचारी, शेतकरी, शेतमजूर यांनी या धोरणाचा निषेध केला. आणि निर्धार केला की, जर सरकारने हे कामगार विरोधी कायदे मागे घेतले नाही तर सरकारला मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा दिला आहे. केंद सरकार जनतेच्या, कामगारांच्या हिताचे कायदे न करता भांडवलदार व कार्पोरेट कंपन्यांच्या हितासाठी काम करत आहे असा आरोप सीटु,आयटक व किसान सभेच्या नेत्यांनी केला. या आंदोलनाचे नेतृत्व कॉम्रेड. रमेशचंद्र दहिवडे, कॉ. डॉ. महेश कोपुलवार, कॉ. अमोल मारकवार, कॉ. देवराव चवळे, यांनी केले. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी कॉग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, सतीश









विधाते, रिपब्लिकन पक्षाचे रो हिदास राऊत, वंचित बहुजन आ घाडीचे नगरसेवक बाळुभाऊ टेंभूर्ने, आजाद पक्षाचे राज बन्सोड, धर्मानंद मेश्राम, कर्मचारी संघटनेचे उमेशचंद्र चिलबुले, मनोह पाटील पोरेटी, वामनराव सावसागडे, चडगुलवार, डॉ. धर्मराज सोरदे इत्यादीनी पाठिंबा दिला. या आंदोलनात चार श्रमसंहिता रद्द करण्यात यावे, 29 कामगार कायदे लागू करण्यात यावे, जी राम जी कायदा रद्द करण्यात यावे, योजना कर्मचाऱ्यांना किमान 26000/- रुपये वेतन देण्यात यावे, अंगणवाडी सेविका मदतनीस यांना ग्रॅज्युटी देण्यात यावी, ठेका पध्दती बंद करण्यात यावे, 60 वर्षावरील सर्व असंघटित क्षेत्रातील कामगारांना तसेच सर्व शेतकरी शेतमजूर यांना मासीक 10000/- दहा हजार पेन्शन देण्यात यावी इत्यादी मागण्या करण्यात आल्या.

## त्रैलोक्य उत्साही कव्वाली मंडळ वासाळा यांच्या 36 व्या वर्षीसुद्धा दुय्यम कव्वालीचा शानदार पंचरंगी मुकाबला

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

आरमोरी : आरमोरी तालुक्यातील वासाळा येथे मंडई निमित्त गावामध्ये मोठ्या प्रमाणात नाटकांच्या आयोजन केले जाते. या गावात 10 तारखेला पाच नाटक व एक कव्वालीचा महामुकाबला सादर केल्या जाते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा त्रैलोक्य उत्साही कव्वाली मंडळ वासाळा यांच्या वर्ष 36 व्या दुय्यम कव्वालीचा शानदार पंचरंगी मुकाबला संपन्न झाला. या मंडळाने गेल्या 36 वर्षापासून दुय्यम कव्वालीचा मुकाबला मंडळाचे तरुण पिढी यांच्या वतीने लोकांच्या मनोरंजनासाठी गावात आणल्या जात असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमासाठी नीलूभाऊ (अजय) सोमनानी हे दुय्यम कव्वालीच्या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. यावेळी मंचकावर सुनील जिभकाटे , मदन मेश्राम संस्थापक किसान विद्यालय वडधा, मंडळाचे अध्यक्ष नविन शेंडे, विदर्भ केसरीचे जिल्हा प्रतिनिधी फुलचंद वाघाडे, (पत्रकार) मंडळाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंचकावर उपस्थित सर्व पाहुण्यांचे मंडळाच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत, सत्कार करण्यात आले. गेल्या 36 वर्षापासून दुय्यम कव्वालीचा मुकाबला या मंडळाकडून सादर करण्यात आले त्या निमित्ताने मंचकावर उपस्थित सर्व पाहुणे आणि गावकरी व रसिक वर्ग यांनी मंडळाचे आभार मानले व सर्व तरुण मंडळींना असेच कार्य करत रहा असे आश्वासित केले.













# शिवराय जन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सवाचे आयोजन

## आज उद्‌घाटनीय कार्यक्रमात इंजि. भाऊसाहेब थुटे यांचे समाजप्रबोधन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विजय निखाते**



पुसद : अखंड महाराष्ट्राची अस्मिता स्वराज्य संस्थापक रयतेचे राजे कुलवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ जयंती पुसद येथे छत्रपती शिवराय जन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सव २०२६ अत्यंत उत्साहात साजरा होत आहे. आज दिनांक १५ फेब्रुवारी रोजी स्व, शेषराव पाटील जिनिंग प्रेसिंग मैदानात साय. ६.३० वा मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटनिय कार्यक्रम संपन्न होत असुन उद्घाटनीय सत्रात प्रमुख आमंत्रित वर्धा येथील सप्तखंजिरी वादक समाज प्रबोधनकार इंजि. भाऊसाहेब थुटे यांचा समाज प्रबोधन पर कार्यक्रम होणार आहे.

दिनांक १६ व १७ फेब्रुवारीला पुष्पावंती परिसरातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांना कला मंच उपलब्ध व्हावा, छत्रपतींचे आचार विचार विद्यार्थ्यांपर्यंत रुजले जावेत या उद्देशाने शिवशौर्यगाथा सांस्कृतिक कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारे सोबतच आपले संस्कृतो दर्शन पडविणाऱ्या कार्यक्रमाची मेजवानी पुसदकरांना मिळणार आहे. १८ फेब्रुवारीला शिवजन्मोत्सवाचा पाळणा महोत्सव संपन्न होईल १९ फेब्रुवारी सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवाजी महाराज याच्या पूर्णाकृती अश्वारूढ पुतळ्याची आकर्षक सजावट पाहायला मिळेल त्याचबरोबर मान्यवरांच्या उपस्थितीत शिवपूजनाचा कार्यक्रम संपन्न होईल, त्यानंतर मोटरसायकल रैली आणि दुपारी २.०० वाजता श्री शिवाजी विद्यालय पुसद येथून शोभायात्रेला सुरुवात होईल. शहरातील मुख्य मार्गानी हि भव्य शिव शोभायात्रा आयोजित करण्यात आली आहे. शोभा यात्रेचे मुख्य वैशिष्टय म्हणजे ही संपूर्ण शोभायात्रा डीजे विरहित असून संस्कृती व संस्काराचे दर्शन घडविणारी राहील. या शोभायात्रेत महाराजाची पालखी, अश्वदल विविध प्रकारचे संस्कृती दर्शन घडविणारे देखावे, लाठी काठी पथक, भजनी मंडळासह शाळा महाविद्यालयाच्या झाकी मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शिवराय जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष हरगोविद कदम, मुख्य समन्वयक राजेश साळुंके, मार्गदर्शक दिगंबर जगताप शोभायात्रा प्रमुख ॲड. भारत जाधव, शिवपूर्व प्रमुख नितीन पवार, मोटार सायकल रैली प्रमुख अभिजीत पानपट्टे, वैभव फुके, सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. गजानन जाधव, यशवंतराव देशमुख, शिव सामान्य ज्ञान समिती प्रमुख चंदू देशमुख यांच्या पुढाकारात विविध समिती प्रमुख व सहकारी, मार्गदर्शक, शिवप्रेमी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. शोभायात्रेदरम्यान जिनिंग प्रेसिंग च्या समोर झाकी मधील सहभागी विद्याव्यांसाठी नाश्ता व पाणी ची व्यवस्था करण्यात येणार आहे. सोबतच सुभाष चंद्र बोस चौकात विश्वनाथ सिंह बयास नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने स्वागत कक्ष उभारण्यात येणार असून शोभायात्रेतील सहभागी विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहार व्यवस्था करण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाला पुसद शहरातील व परिसरातील समस्त शिवप्रेमींनी सहकुटुंब सहपरिवार उपस्थित्त राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. सोबतव छत्रपतींचा पराक्रम व इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने ७ फेब्रुवारीला शिव सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा संपन्न झाली या परीक्षेत ११००० पेक्षा जास्त विद्यार्थी स्वयंस्फुर्तीने सहभागी झाले होते. २० फेब्रुवारीला वैभव फुके यांच्या पुढाकारात शरीरसौष्ट्य स्पर्धा होणार आहे. हा संपूर्ण शिवजन्मोत्सव जात धर्म पंथ याच्या पलीकडे जाऊन एकतेची शिकवण देणारा असणार आहे अशी माहिती शिवराय जन्मोत्सव समिती च्या वतीने पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी आयोजित पत्रकार परिषदेला शिवजन्मोत्सव समितीच्याः पदाधिका-यांसह निशांत बयास, भारत पेन्शनबार, एड, रमेश पाटील, कैलास गावणार, किशोर कांबळे, पांडुरंग व्यवहरे शेख नईम, इंदल राठोड आदी सामाजिक कार्यकर्त्यांसह शिवप्रेमी उपस्थित होते.
अध्यक्ष/समन्वयक छत्रपती शिवराय जन्मोत्सव समिती पुसद

दैनिक विदर्भ केसरी TODAY

गडचिरोली

GOOD MORNING

## सत्य साई सेवा समिती गडचिरोलीच्या वतीने टेंभा येथे साधना शिबिराचे आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गडचिरोली तालुक्यातील मौजा टेंभा येथे सत्य साई सेवा समिती गडचिरोली आणि सत्यसाई सेवा सेवक मंडळ टेंभा यांच्या पुढाकाराने टेंभा (गणपूर ) येथील प्रसिद्ध हनुमान मंदिर येथे साधना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराला सत्यसाई सेवा समितीचे पदाधिकारी, साईराम भक्त , महिला वर्ग, मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संक्षिप्त



### महारेशीम अभियान-2026 : 'रेशीम रथ'ला हिरवी झेंडी; शेतकऱ्यांसाठी लाखो रुपयांच्या अनुदानाची संधी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती गावपातळीवर पोहोचविण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, आरमोरी यांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'रेशीम रथ'चा शुभारंभ दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आला. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी प्रीती हिरळकर यांच्या हस्ते तसेच मत्स्य विभागाचे सहाय्यक आयुक्त समिर डोंगरे यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून या जनजागृती मोहिमेची सुरुवात करण्यात आली. यावेळी रेशीम विकास अधिकारी ए. व्ही. वासनिक, वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक जी. आर. उईके, क्षेत्र सहाय्यक कु. ए. एन. नाखले, सी. व्ही. विठ्ठले आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग विभाग व रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात 'महारेशीम अभियान-2026' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रेशीम उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी दि. १० फेब्रुवारी २०२६ ते ०५ मार्च २०२६ या कालावधीत नोंदणी करणे आवश्यक आहे. टसर रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी नोंदणी पूर्णपणे नि:शुल्क असून तुती लागवडीस पात्र शेतकऱ्यांना १ एकर क्षेत्रासाठी केवळ ५०० रुपये नोंदणी शुल्क भरून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा लागणार आहे. रेशीम उद्योग हा शेतीआधारित असल्याने शेतकरी स्वतःच्या शेतीवर किटक संगोपन करून कोष उत्पादनातून थेट उत्पन्न मिळवू शकतात. या माध्यमातून वर्षाकाठी सुमारे १.५० ते २.०० लाख रुपये निव्वळ नफा मिळू शकतो, अशी माहिती रेशीम विकास अधिकारी ए. व्ही. वासनिक यांनी दिली. केंद्र पुरस्कृत 'सिल्क समग्र-२' योजनेअंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना १ एकर तुती लागवडीसाठी तुती रोपे, सिंचन संच, किटक संगोपन गृह, संगोपन साहित्य व निर्जंतुकीकरण औषधे यासाठी एकूण रुपये ३,७५,००० पर्यंत अनुदान देण्यात येते. तसेच 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा)' अंतर्गत समाविष्ट गावांतील शेतकऱ्यांना रुपये ३,२५,१२५ इतके अनुदान उपलब्ध आहे. 'महारेशीम अभियान-2026' अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालय, आरमोरी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालय, वडसा रोड, आरमोरी, जि. गडचिरोली येथे संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# भामरागड ग्रामीण रुग्णालयाची आरोग्यमंत्र्यांकडून पाहणी

## व्यवस्थापनातील त्रुटींवर तीव्र नाराजी, सुधारणा न झाल्यास कठोर कारवाईचा इशारा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

भामरागड : ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्याच्या उद्देशाने राज्याचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी भामरागड येथील ग्रामीण रुग्णालयाला अचानक भेट देत सर्व विभागांची सखोल पाहणी केली.

या पाहणीदरम्यान रुग्णालयातील व्यवस्थापनातील काही त्रुटी त्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सुधारणा करण्यात अपयश आल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. रुग्णालयातील स्वच्छता, औषधसाठा, वैद्यकीय उपकरणांची उपलब्धता, रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा तसेच डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती याबाबत मंत्र्यांनी बारकाईने आढावा घेतला. काही विभागांमध्ये आवश्यक ती शिस्त आणि समन्वयाचा अभाव आढळल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे ही सरकारची सर्वोच्च जबाबदारी असून तिच्या अंमलबजावणीत कोणतीही शिथिलता सहन केली जाणार नाही, असे त्यांनी ठाम शब्दांत सांगितले. "भामरागडसारख्या अतिदुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांना आरोग्यसेवेसाठी इतरत्र भटकंती करावी लागू नये. येथेच सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची बांधिलकी आहे. रुग्णालय हे केवळ इमारत नसून ते जनतेच्या विश्वासाचे केंद्र आहे. त्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही," असेही त्यांनी स्पष्ट केले. या भेटीदरम्यान विशेष कार्य अधिकारी मंगेश चिवटे, आरोग्य उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा लहाडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. बगराज धुर्वे, सहाय्यक जिल्हाधिकारी अमर राऊत, तहसीलदार किशोर बागडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनीष धकाते यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शिवसेना (शिंदे गट) चे कार्यकर्ते आणि पदाधिकारीही यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्र्यांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधत





त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. औषधांची उपलब्धता, तपासण्यांची वेळ, आपत्कालीन सेवांची कार्यक्षमता आणि प्रसूती विभागातील सुविधा याबाबत त्यांनी प्रत्यक्ष माहिती घेतली. काही रुग्णांनी उपचारांमध्ये होणारा विलंब आणि तांत्रिक अडचणींची माहिती दिली. यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी त्यांनी रुग्णालय प्रशासनाला ठोस कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. आवश्यक मनुष्यबळाची भरती, रिक्त पदे भरणे, उपकरणांची देखभाल आणि नियमित तपासणी यावर विशेष भर देण्यास सांगितले. तसेच ग्रामीण आरोग्यसेवेच्या बळकटीकरणासाठी शासन पातळीवर आवश्यक निधी आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. भामरागडवासीयांनी आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या या ऐतिहासिक भेटीचे उत्स्फूर्त स्वागत केले. ही भेट केवळ औपचारिक पाहणी नसून आरोग्य क्षेत्रात नवसंजीवनी देणारी ठरेल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. दुर्गम भागातील आरोग्य समस्यांकडे शासनाचे लक्ष वेधले जावे, ही स्थानिकांची मागणी या भेटीमुळे पूर्ण होईल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. आरोग्यमंत्री यांच्या या दौऱ्यामुळे प्रशासनात चैतन्य निर्माण झाले असून, येत्या काळात भामरागड ग्रामीण रुग्णालयात लक्षणीय सुधारणा दिसून येतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्थेला अधिक सक्षम आणि उत्तरदायी बनवण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

## चामोर्शी ते भेंडाळा मार्गांवरील चाकलपेठ फाट्यावर ट्रकच्या धडकेत मेंढपाळ वडील गंभीर, तर मुलगा किरकोळ जखमी

### 40 मेंढ्यांना चिरडून ट्रक चालक फरार...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

चामोर्शी : दिनांक,13/02/2026 शुक्रवार ला पहाटे 4:00.वा.दरम्यान मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन स्वतःच्या गावी रामाळा येथे जात असतांना चामोर्शी ते भेंडाळा मार्गांवर येणारी ट्रक चाकलपेठ फाट्यावर मेंढपाळ बाप - लेकाला जोरदार धडक दिली.मेंढपाळ मारोती रामा अन्नावार वय,55 वर्ष हे गंभीर जखमी झाले.

मुलगा अतुल मारोती अन्नावार वय,28 वर्ष रा. रामाळा ता.चामोर्शी जिल्हा.गडचिरोली हे किरकोळ जखमी झाले. त्यात 40 मेंढ्या चिरडल्या गेल्यामुळे मेंढपाळाचे खुप मोठे नुकसान झाले.गंभीर जखमी झालेल्या मारोती अन्नावार यांना जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली भरती केले.परंतु त्यांना डोक्याला आणि छातीला जास्त मार लागून गंभीर असल्यामुळे गडचिरोली वरून नागपूर ला हलविण्यात आले.पुढील तपास चामोर्शी पोलिस करीत आहेत.

सदर घटनेची माहिती मिळाली मिळताच एस.के.24 तास चे मुख्य संपादक, सुरेश कन्नमवार व प्रशांत देव्हारे जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी गडचिरोली यांनी सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे भेट घेऊन नातेवाईकांकडून विचापूस करून, श्री.नितीन गावंडे अतिरिक्त जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना घटनेची माहिती देऊन तात्काळ ट्रक चा शोध घेऊन कारवाई करावी. नुकसान भरपाई मेंढपाळ यांना देण्यात यावे. यासाठी निवेदन देण्यात आले. ट्रक चालक फरार झाला.असून त्यांचा शोध घेऊन त्याच्यावर कारवाई करावी. मेंढपाळ बांधवाला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी गडचिरोली - चंद्रपूर धनगर / कुरमार समाज मंच चे सर्व पदाधिकारी बांधवांकडून केले आहे.

### नवले पूलजवळ बसच्या धडकेत महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुणे येथील नवले पूल परिसरात एका आराम बसने धडक दिल्याने दुचाकीस्वार महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाला. या अपघातात दुचाकीवरील त्याची मैत्रीण जखमी झाली आहे. ही घटना कात्रज बाह्यवळण मार्गावर घडली. नितीन जुनवणे (वय १९, रा. धायरी फाटा, सिंहगड रस्ता) असे मृत तरुणाचे नाव आहे. अपघातात जखमी झालेल्या नितीनच्या मैत्रिणीने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली आहे. दोघेही महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नितीन आणि त्याची मैत्रीण रात्री पावणेदहाच्या सुमारास नवले पूल परिसरातून कात्रजच्या दिशेने जात होते. त्यावेळी एका प्रवासी आराम बसने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर दोघेही गंभीर जखमी झाले. नितीनला रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर बसचालक घटनास्थळावरून पसार झाला असून, पोलीस त्याचा शोध घेत आहेत. पोलीस उपनिरीक्षक प्रियंका निकम या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## राज्यात चार अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅबसाठी १०० कोटी : आरोग्यमंत्री आबिटकर यांची माहिती

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे



गडचिरोली : राज्यात पुणे, जालना, गडचिरोली व कोल्हापूर या चार जिल्हयांमध्ये कार्डियाक कॅथलॅब उभारणीस सार्वजनिक आरोग्य विभागाने मंजुरी दिली असून त्यासाठी ९९ कोटी ८५ लाख ८९ हजार रूपयांचा निधी मंजूर केला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली असल्याची माहिती राज्याचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. राज्यात हृदयविकार व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आणि दिलासादायक ठरणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज तसेच कोल्हापूर शहरातील सेवा रूग्णालयात ही सुविधा उपलब्ध होत असल्याने कोल्हापूरसह सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. आतापर्यंत हृदयविकाराच्या गंभीर रुग्णांना अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टीसारख्या तपासण्या व उपचारांसाठी पुणे किंवा मुंबई येथे जावे लागत होते. त्यामुळे रुग्णांच्या उपचारात विलंब होण्याबरोबरच आर्थिक भार आणि मानसिक तणावही मोठ्या प्रमाणात वाढत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाने राज्यातील पुणे, जालना, गडचिरोली आणि कोल्हापूर या चार जिल्हा रुग्णालयांमध्ये कार्डियाक कॅथलॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी ईपीसी पद्धतीने करण्यात येणार असून, यामध्ये कॅथलॅब उभारणीसाठी आवश्यक असलेली संरचनात्मक रचना,यांत्रिकी,विद्युत, प्लंबिंग आराखडे, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची खरेदी, त्यांची उभारणी, चाचणी, साठवण, वितरण तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन या सर्व बाबींचा समावेश राहणार आहे. उपकरणांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये यासाठी शासनाने निश्चित केलेल्या तांत्रिक निकषांनुसार प्री-डिस्पॅच आणि पोस्ट-डिस्पॅच रँडम सॅम्पल तपासणी केली जाणार आहे. जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य सेवा संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कार्डियाक कॅथलॅबमुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळे तातडीने शोधणे व त्यावर त्वरित उपचार करणे शक्य होणार असून, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाच्या 'गोल्डन अवर'मध्ये उपचार उपलब्ध झाल्याने अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होणार आहे.

### हृदयविकार रुग्णांसाठी महत्त्वाचा निर्णय

■ राज्यात हृदयविकार व रक्तवाहिन्यांशी संबंधित आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. या रुग्णांना वेळेवर निदान व उपचार मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आतापर्यंत कार्डियाक कॅथलॅबसाठी रुग्णांना पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरात जावे लागत होते. त्यामुळे आर्थिक, शारीरिक व वेळेचा मोठा ताण रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांवर पडत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाने कोल्हापूरसह पुणे, जालना आणि गडचिरोली या चार जिल्हा रुग्णालयांमध्ये कार्डियाक कॅथलॅब उभारण्याचा निर्णय घेतला आहे.







## उपजिल्हा रुग्णालय, आरमोरी येथे डिजिटल लॅप्रोस्कोपिक सेंटर व डायलिसिस युनिटचे उद्घाटन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : उपजिल्हा रुग्णालय, आरमोरी येथे (CSR Fund अंतर्गत) नव्याने सुरू करण्यात आलेल्या Digital Laparoscopic Center तसेच CI CorporatiDia Dialysis Unit चे उद्घाटन दिनांक १३/०२/२०२६, शुक्रवार रोजी उत्साहात पार पडले. या सुविधांचे उद्घाटन आमदार श्री. रामदासजी मसराम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ग्रामीण भागातील रुग्णांना आता अत्याधुनिक वैद्यकीय सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार असून, यामुळे उपचारासाठी दूरवर जाण्याची गरज कमी होईल. डिजिटल लॅप्रोस्कोपिक सेंटरमुळे अत्याधुनिक व कमी वेदनादायी शस्त्रक्रिया आरमोरीतच शक्य होणार आहेत, तर नव्याने सुरू झालेल्या डायलिसिस युनिटमुळे किडनी रुग्णांना नियमित व सुलभ उपचार मिळणार आहेत. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या प्रसंगी उपस्थित राजकीय बहु. सामाजिक संस्था गोंदिया अध्यक्ष धीरजकुमार मेश्राम, काँग्रेस कमिटी तालुकाध्यक्ष आरमोरी मिलिंद खोब्रागडे, काँग्रेस कमिटी जिल्हा उपाध्यक्ष दिलीप घोडाम, नगरसेवक माणिक भोयर, नगरसेविका मने ताई, राजगिरी बहू सामाजिक संस्था गोंदिया रजनी रामटेके, अभय ढेंगे, राजगिरी बहु सामाजिक संस्था गोंदिया अमर राहुल, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ वासनिक, मडावी सर, डॉ.धात्रक, डॉ. कावळे, डॉ. वासनिक, डॉ. रामटेके, तसेच वैद्यकीय अधिकारी, कर्मचारीवर्ग, स्थानिक पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# राज्यपालानी दत्तक घेतलेल्या भामरागड तालुक्याचा विकास कधी होणार ?

## परिसरातील ग्रामस्थ तथा डॉ. प्रणय खुणे राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष यांची मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

भामरागड : गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त पट्ट्यातील गावांमध्ये मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रणय खुणे राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे प्रदेशअध्यक्ष यांनी प्रत्यक्ष दौरा करून स्थानिक परिस्थितीची पाहणी केली व ग्रामस्थांशी संवाद साधला. भामरागड तालुक्यातील धोडराज, इरपणार, प्रायणार आणि पेनगुंडा या गावांमध्ये पोहोचून त्यांनी नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. या भागात दळणवळणाची साधने अत्यल्प असून विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होते, असे ग्रामस्थांनी सांगितले.

धोडराज- इरपणार रस्ता आहे पण नाला आडवा असल्यामुळे तिथे पूल नाही आणि नाल्यावर पूल नसल्याने 10 ते 12 गावातील ग्रामस्थांचे हाल होत असल्याची खंत गावकऱ्यांनी बोलून दाखवली.. "स्थानिकांच्या म्हणण्यानुसार"_ राज्यपालांनी दत्तक घेतलेल्या भामरागड तालुक्यात ये - जा करण्यासाठी मधोमध एक मोठा नाला आहे. पावसाळ्यात हा नाला पूर्ण भरून वाहतो, त्यामुळे 10 ते 12 गावांचा संपर्क तुटतो. विद्यार्थ्यांचे शिक्षण, रुग्णांना दवाखान्यात नेणे, शासकीय कामे आणि दैनंदिन जीवन यावर याचा गंभीर परिणाम होतो. गेल्या काही वर्षात डिलिव्हरी साठी जात असलेल्या महिलेचा मृत्यू झाला असून त्यानंतर दोन शिक्षकांचा सुद्धा मृत्यू झाल्याची माहिती गावकऱ्यांनी दिली आहे.

### पुलासाठी जोरदार मागणी

■ ग्रामस्थांनी या नाल्यावर तातडीने पुलाला मंजुरी देण्याची मागणी केली आहे. अनेक वर्षांपासून ही मागणी प्रलंबित असून प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला. "पूल झाला तर आमचे जीवन सुलभ होईल ; अन्यथा आम्हाला पावसाळ्यात अक्षरशः बेटासारखे जगावे लागते," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

### आंदोलनाचा इशारा

■ जर लवकरात लवकर पुलाला मंजुरी देऊन काम सुरू केले नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला. यावेळी डॉ.खूणे यांनीही नागरिकांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवून योग्य पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या अतिदुर्गम आणि संवेदनशील भागात पायाभूत सुविधा उभारण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली असून, प्रशासन यावर कितपत तत्परतेने निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.












# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




## खा... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...

जिल्हा प्रतिनिधी

- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती

जिल्हा प्रतिनिधी

- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला

जिल्हा प्रतिनिधी

- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ

जिल्हा प्रतिनिधी

- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.


### बुलढाणा

जिल्हा प्रतिनिधी

- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर

- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**